आम्ही **पार्लेकर**

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे    अंक दुसरा    पृष्ठे १३    फेब्रुवारी २०२२    www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92



या अंकात

पान ०२ पार्ल्याचा वॉल स्ट्रीट: नेहरू रोड!!

पान ०३ चित्र समिक्षेची साधना

पान ०४ घाणेकर मार्ग म्हणू या ! आझाद रोड नको

पान ०७ वाघांच्या आयुष्यावर बोलू काही - भाग ३ माहित नसलेल्या रंजक गोष्टी




पान १३

**लतादीदींचे पार्ल्याशी असलेले ऋणानुबंध**

# पार्ले कन्यकांची भरारी

**मुळातच पार्लेकर आधुनिक प्रगत विचारांचे. त्यामुळेच त्यांच्या लेकीही कोणत्याही क्षेत्रात धडाडीने यशस्वी होतात. त्यांच्या कर्तृत्वाचा पार्लेकरांना अभिमान असतो, कौतुक असते. अशाच दोन वेगळ्या आर्थिक स्तरातल्या आणि वेगळ्या क्षेत्रातल्या पण आपल्या भरारीने कौतुकास पात्र ठरलेल्या पार्लेकर कन्यका.**

## पार्ल्याची रिक्षावाली - सोनल पटेल - खारवी

पार्लेकर नेहमीच आधुनिक व प्रगत विचारांचे आहेत. इथलीच नंदा पातकर रोडला माहेर असलेली आणि लग्नानंतर जे. पी. नगरला राहायला गेलेली सौ. सोनल पटेल - खारवी ही विलेपार्ल्यातील पहिली महिला रिक्षा मालक व चालक बनली आहे.



पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या व्यवसायात घरातील जेष्ठांचा थोडासा विरोध पत्करूनच तिने ठामपणे पदार्पण केले. प्लंबिंगचे काम करणाऱ्या यजमानांची पायाची शस्त्रक्रिया झाली व त्यांना ते काम सोडावे लागले. अशावेळी घराचा आर्थिक भार उचलण्यासाठी सोनलने धिटाईने पाऊल उचलले. यशस्वीपणे सकाळी ९ ते रात्री ९ रिक्षाचा व्यवसाय सुरू केला आहे. दोन लहान मुलांचा संसार सांभाळणाऱ्या सोनलला वयोवृद्ध व लहान मुलं यांच्यासाठी स्पेशल सर्विस द्यायची इच्छा आहे. आत्मविश्वासाने ऐटीत रिक्षा चालवणारी सोनल नवीन पिढीचा आदर्श बनू शकते. ■

## आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत डॉ. देविका विजेती

विक्वीन मिस अँड मिसेस दीवा वर्ल्डवाइड २०२१, **(Wequeen Miss and Mrs Diva Worldwide 2021)** ह्या आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत वय वर्ष २२ ते ३५ या प्राईड कॅटेगरीत डॉ. देविका देशमुख (एम.डी. आयुर्वेद) हिने घवघवीत यश मिळवले आहे. रविवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी झालेल्या अंतिम फेरीमध्ये ती सर्वप्रथम आली आहे.



ऑस्ट्रेलिया, इटली, थायलँड, कॅनडा, नेपाळ, मलेशिया, फिलिपाईन्स, मॉरिशस, साऊथ आफ्रिका, जपान अशा अनेक देशांतील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्व स्पर्धकांना त्यांचे विविध प्रकारचे कौशल्य व्हिडिओ द्वारा सादर करण्यास सांगितले गेले होते. ५ देशातून या क्षेत्रातील नामांकित परीक्षक आले होते. त्यांनी वैयक्तिक मुलाखत व प्रश्न उत्तर फेरी ऑनल२०१९ मध्ये 'मिसेस पार्ले' हा पुरस्कार मिळाल्यानंतर डॉ देविकाला आता आंतरराष्ट्रीय स्तरावर हा पुरस्कार मिळाला आहे. तिला **'Face of Beauty'** हा बहुमान देखील या स्पर्धेत मिळाला आहे.

डॉ. देविका बारा वर्षे आयुर्वेदिक व पंचकर्म वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असून त्यातील चार वर्षे तिने अमेरिकेत आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार केला आहे. तिच्या नृत्य, रायफल शूटिंग, स्केटिंग, व्हायोलिन वादन, विविध देशातील प्रवास व चौफेर वाचन, या सर्व छंदांचा तिला या स्पर्धेत खूप चांगला उपयोग झाला असे ती विशेष नमूद करते.

आपल्या यशाचे श्रेय डॉ. देविका तिच्या आयुर्वेदिक दिनचर्येला, मातृत्व प्राप्त झाल्यानंतर घेतलेल्या आयुर्वेदोक्त काळजीला, तिचे पालक, पती, मार्गदर्शक तसेच तिचे केरळीय आयुर्वेदिक क्लिनिक मधील सहकारी यांना देते.

डॉ. देविकाला तिच्या यशस्वी भवितव्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा. ■


इ.सन १९३२ पासून

साठे यांचे **विजय स्टोअर्स**

सहजीवन, ४, श्रध्दानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.

फोन - +91 91676 00365, 022-2614 6641

**मंगळवार दि. १ मार्च २०२२**

महाशिवरात्री खास उपवासाकरिता उपवास भाजणी, शिंगाडा पीठ, साबुदाणा पीठ, वरी पीठ, केळा पीठ, राजगिरा पीठ, साबुदाणे, शेंगदाणे, दाणेकुट, तळलेले फणस गरे, फणस पोळी, आंबा पोळी, बटाटा चिवडा, डिंक लाडु, आळीव लाडु, राजगिरा चिक्की, साधे बटाटे वेफर्स, साबुदाणा चिवडा



नागोठण्याचे कडवे वाल

श्रीखंड, आम्रखंड, मलईयुक्त चक्का, मोतीचूर लाडु, बेसन लाडु, रवा लाडु, कणिक लाडु, मुग लाडु, कडक बुंदी लाडु, आंबा वडी, श्रीखंड वडी, कच्चा पोहा चिवडा, सफेद / लाल बटाटा चिवडा, तळलेला चिवडा, शेव, लसूण शेव, चिरोटे, अनारसे, भाजणी चकली, बटर चकली, ओल्या नारळाची करंजी, बेक करंजी, तेलपोळी, उंधियो, सुकामेवा इतर तयार पदार्थ मिळतील. पापड, मिरगुंड, शेवया, कुरडई, पोहा डांगर, मेतकुट, कडधान्य, भिजलेली कडधान्य, सर्व प्रकारच्या चटण्या, लोणचे, पीठे, घरगुती मसाले, हळद, तिखट, इत्यादी पदार्थ मिळतील

**गुरुवार दि. १७ मार्च २०२२ होळी पौर्णिमा करिता**




अळूवडे, चकली, चिवडा, शेव सर्वप्रकारचे लाडू तयार मिळतील. चणाडाळ, वेलची, जायफळ, गुळ, मैदा, तांदूळ पीठ, सर्वप्रकारच्या भाजण्या व मसाले (नवीन हळद व तिखट) मिळेल.

जायफळ युक्त पुरणपोळी, गुळपोळी, श्रीखंड, आम्रखंड ओले काजु

आपल्या परदेशातील आप्तेष्टांना घरगुती, स्वादिष्ट फराळ कुरियरने पाठविण्यासाठी सुवर्णसंधी

visualize life with healthy eyes

PENDHARKAR EYE CLINIC



Facilities Available
- Stitch less Cataract Surgery
- Lasik
- Retina Examination
- Superspeciality Consultation
- OCT
- Fundus Photo
- Glaucoma workup
- Dry Eye workup
- Perimetry
- Corneal Topography
- Yag Laser
- Green Laser
- Optical Shop

Dr.Madhura Pendharkar
MBBS, MS Ophthalmologist / Eye Surgeon
Fellowship in Cataract & Refractive Surgery

Time : 5.00 pm to 9.00 pm

Call for Eye Checkup

Satya Bldg, Sahakar Rd, Next to Sangita Ellipse, Opp. Sahavas CHS, Vile parle (E)

8007197766

## संपादकीय

कोव्हीडचा भर आता नक्कीच ओसरू लागला आहे आणि जनजीवन पूर्ववत व्हायला सुरवात झाली आहे. हे असले तरी गेल्या दोन वर्षात अर्थव्यवस्थेला जोरदार फटका बसला आहे हे नाकारता येणार नाही.

ह्या काळात काहींना आपली नोकरी गमवावी लागली, तर काहींचा पगार कमी झाला. EMI वर चैन करणाऱ्या लोकांची तर फारच पंचाईत झाली. अनेक मध्यमवर्गीयांना आपली मालमत्ता विकण्याची सुद्धा वेळ आली. पार्ल्यातील सुखवस्तू वातावरणात हे चटके आपल्याला जाणवत नाहीत पण ह्या महामारीमुळे अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत हे सत्य आहे. बहुतेक सर्वच उद्योगांना ह्या काळात प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे. विशेषत: छोट्या उद्योगांचे तर कंबरडेच मोडले आहे. अनेक उद्योगांना कायमचे कुलूप लागले आहे. मुंबई जवळच्या औद्योगिक वसाहतींमधून एक चक्कर मारली तर परिस्थिती किती भयाण आहे ह्याची आपल्याला कल्पना येऊ शकते.

मित्रांनो, आर्थिक नुकसानीच्या ह्या काळ्याकुट्ट ढगाला एक रुपेरी किनार सुद्धा आहे. असे म्हणतात कि प्रत्येक संकट ही एक संधी असते. ह्या महामारीने आपले जरी प्रचंड नुकसान केले असले तरी काही नवीन गोष्टी शिकवल्या सुद्धा. Digitalization हा आज परवलीचा शब्द झाला आहे. अनेक मनोरंजनाचे तसेच कॉर्पोरेट कार्यक्रम digital फॉरमॅट मध्ये होऊ लागले आहेत. 'खऱ्या कार्यक्रमाची सर डिजिटल कार्यक्रमाला नाही' असे काही जण म्हणू शकतील आणि त्यात काही अंशी तथ्य सुद्धा आहे. पण त्याच बरोबर Digitalization मुळे पैसे, वेळ, शक्ती ह्यांची बचत होते आणि ह्या माध्यमाची झेप संपूर्ण जगाला गवसणी घालू शकते हे ही तितकेच खरे आहे. कोव्हिडची महामारी जरी संपली तरी Digitalization ची प्रक्रिया थांबेल असे मानणे चुकीचे ठरेल.

कोव्हीड नंतरच्या नव्या जगात जर टिकायचे असेल तर काही नवीन गोष्टी शिकायची, आत्मसात करायची तयारी ठेवली पाहिजे. आजची युद्धे ढाल तलवारीने नव्हे तर आधुनिक शस्त्रांनी व तंत्रज्ञानानी लढली जातात, होय ना !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# पार्ल्याचा वॉल स्ट्रीट : नेहरू रोड !!

**मंडळी नमस्कार,**

यावेळी आपण पार्ल्यातील दुसऱ्या एका महत्त्वाच्या मार्गाबद्दल जाणून घेऊया. पार्लेकर्सना अभिमान वाटावा अशी आणखी एक गोष्ट पार्ल्यामध्ये आहे! एका टोकाला रेल्वे स्टेशन आणि दुसऱ्या टोकाला चक्क विमानतळ अशी मिरासदारी बाळगणारा जगातील कदाचित एकमेव रस्ता आपल्याकडे आहे आणि तो म्हणजे आपला चिरतरूण नेहरू रोड!

या रस्त्याचे नाव जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिले गेले असेल असा बहुतेकांचा



समज आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल की हे नाव पंडितजींवरून नव्हे, तर मोतीलाल नेहरू यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिले गेले आहे! १९०७ साली जेव्हा विलेपार्ले स्टेशन सुरू झाले तेव्हा नेहरू रोड अस्तित्वातही नव्हता. स्टेशनच्या दक्षिणेच्या बाजूने गावात जाण्यासाठी एक रस्ता बांधण्याचे ठरवले गेले. स्टेशनजवळील कांबळीवाडी आणि आजुबाजूचा मोठा परिसर डॉक्टर मुकुंद सदाशिव तथा दादा कांबळींच्या मालकीचा होता. डॉक्टर साहेबांनी आनंदाने आपल्या जागेतील भाग शासनाला दिला. सुरुवातीला पार्ल्यातील इतर रस्त्यांप्रमाणे नेहरू रोडसुद्धा दगड न वापरता मुरूम पसरवून बनवला गेला होता. दगड वापरून केलेला व्यवस्थित, प्रशस्त रस्ता बघण्यासाठी पार्लेकरांना १९२३ पर्यंत वाट पाहावी लागली. साधारण २००५-०६ च्या मागे-पुढे नेहरू रोडचे कॉंक्रिटीकरण झाले.

नेहरू रोडचे दुसरे वैशिष्ट्य फारच अर्थपूर्ण आहे. या मार्गावर किती बँका असू शकतील असा तुमचा अंदाज आहे? State Bank E Lobby, IDFC, ICICI, Bank of Baroda, Axis Bank, Kotak Mahindra, Canara, Yes Bank, Rupee, UCO, Indian Bank, SHAMRAO VITTHAL, Thane Janata Sahakari, Indusind, Saraswat, Punjab Bank, HDFC, NKGSB अशा तब्बल १८ बँका या मार्गावर आहेत! त्या दृष्टीने नेहरू रोड ही पार्ल्याची अर्थवाहिनी आहे आणि पार्लेकरांसाठी तो वॉल स्ट्रीटहून कमी नाही!

नेहरू रोडच्या मुखावरच १९४३ मध्ये रामकृष्ण भुवन नावाचे कॉफी हाऊस सुरू झाले. त्याचेच नाव पुढे रामकृष्ण असे झाले. रामकृष्ण हॉटेल आहे. पुढे ते शेट्टी कुटुंबीयांनी विकत घेतले. पुढे गेले की डाव्या बाजूला राममंदीर मार्ग सुरू होतो. तेथे विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले पार्ले बुक डेपो आणि लगेच उजव्या बाजूला पौर्णिमा बुक डेपो ही दोन्ही दुकाने विद्यार्थ्यांना गेली कित्येक वर्षे पुस्तकसेवा देत आहेत. पार्लेकरांना ड्रायव्हिंग शिकवणारी संगम आणि चौहान मोटर ड्रायव्हिंग स्कूल इथेच आहेत. त्याला लागून पार्लेकरांच्या सायकलप्रेमाचे प्रतीक असलेले उपाध्याय सायकल मार्ट कित्येक वर्षे स्कूटर-मोटारींच्या जमान्यातही अभिमानाने उभे आहे. पुढे भोगले चौकामध्ये डाव्या बाजूला एक कौलारू इमारत बरीच वर्षे होती. त्यावेळी तेथे कॅफे मैलू हे इराणी हॉटेल होते. वीस-एक वर्षांपूर्वी ती पाडून आता मोठी इमारत बांधली गेली आहे. कॅफे मैलू एक छोटे बेकरी दुकान म्हणून अजूनही सुरू आहे. उजव्या बाजूला पावभाजीफेम हॉटेल शिवसागर. मुंबई बाहेरचे पाहुणे आले की शिवसागरची पावभाजी खाल्ल्याशिवाय पार्लेकर त्यांना परत पाठवत नाहीत.

जवाहर बुकडेपोचे संस्थापक श्री मारुती भोगले यांच्या स्मरणार्थ श्रद्धानंद रोड आणि नेहरू रोड यांच्या छेदबिंदूवरील चौकाला १९९७ साली भोगले चौक असे नाव दिले गेले. चौकामध्ये वाचन संस्कृती वाढवणे आणि मुलींना



वाचवणे, शिकवणे असे संदेश देणारी दोन सुंदर शिल्पे आहेत.

अजून पुढे गेले की डाव्या बाजूला मालवीय रस्ता सुरू होतो. सुरुवातीलाच विलेपार्ल्याच्या पोस्ट ऑफिसची कोकणी पद्धतीची कौलारु इमारत आहे. येथे भोला सॅंडविच सेंटर आहे. या भोलाची गाडी तीसेक वर्षांपूर्वी पार्ला कॉलेजच्या दीक्षित रोडवर असायची. तिथे म्हणे माधुरी दीक्षित सॅंडविच खायला यायची! त्यामुळे आम्ही पण खायला जायचो. तेवढाच माधुरीचा एहसास! नंतर भोला गावाला निघून गेला आणि त्याचा भाऊ आता ती गाडी चालवतो. पुढे ग्रीन हाऊस हे अप्पर मिडल क्लास पार्लेकरांमध्ये लोकप्रिय



असलेले रेस्टॉरंट. पुढे काही फुटांवर पार्लेकरांचे चोचले पुरवणारे सौराष्ट्र फरसाण भांडार. सौराष्ट्रचा सामोसा आणि खमण खाल्ली नाही असा पार्लेकर नसेल!

त्यापुढे आनंदराव पाखाडे चौक. किती पार्लेकरांना आनंदराव पाखाडेंबद्दल माहित आहे याची आम्हास शंका आहे. आनंदराव हे अत्यंत थोड्या मराठी उद्योजकांपैकी एक होते. लॅमिंग्टन रोड येथे राहणारे आनंदराव १९१४ साली पार्ल्यामध्ये आले आणि त्यांनी नेहरु रोडवर आपला बंगला बांधला. निस्सिम साई भक्त असलेल्या आनंदरावांनी विलेपार्ले आधुनिक बनवण्यासाठी भरपूर योगदान दिले आहे.

पुढे आलो की डाव्या बाजूला साठ्ये(पार्ले) कॉलेजकडे जाणारा दीक्षित रस्ता आणि लगेच डाव्या बाजूला हॉटेल कॅम्पस. याचे आधीचे नाव उपकार असे होते. येथेच उजव्या बाजूला भारत हिंदू हॉटेल हे वैशिष्ट्यपूर्ण नाव असलेले साठ-सत्तर वर्षांहून जुने हॉटेल. पुढे उजव्या बाजूला



दोन सुप्रसिद्ध बंगले. त्यातला एक म्हणजे घड्याळ बंगला. त्याच्यावर असलेल्या घड्याळामुळे तो पार्ल्यातील एक लॅंडमार्क झाला होता. तो आता पाडून तेथे टोलेजंग इमारत झाली आहे. पुढे नरिमन मार्गाच्या कोपऱ्यावर चोक्सीभुवन नावाचा एक सुंदर बंगला १९३३पासून पार्ल्यातील गतकाळाची साक्ष देत उभा आहे. छोटेखानी राजवाड्यासारखा दिसणारा हा धवलरंगी बंगला पूर्वी त्याच्या समोर असलेल्या छोट्या उद्यानामुळे आणि त्यातील पुतळ्यांमुळे अधिकच आकर्षक दिसायचा. आता ते उद्यान नाहिसे झाले आहे आणि जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी दिसणाऱ्या कॉंक्रीटने त्याची जागा घेतली आहे. पुढे डाव्या बाजूला पूर्व पार्ल्यामधील एकमेव पेट्रोल पंप. याच्या समोर शेट्टींचे जेनेसिस हे सुंदर रिसॉर्ट कम हॉटेल . येथेही एका लक्ष्मीवंताचा अतिशय सुंदर बंगला पंधरा-वीस वर्षांपूर्वी होता.

चोक्सीभुवन सारखाच एक सुंदर, शिरोडकर बंगला, दयाळदास रोड आणि नेहरू रोड यांच्या छेदबिंदूवर उजव्या बाजूला होता. तोही आता लयास जाऊन तेथेही गगनचुंबी इमारत उभी राहिली आहे.

पुढे लगेच उजव्या हाताला दाक्षिणात्य पारंपारिक आदर उडुपी हॉटेल आणि त्याच्या बाजूलाच अमेरिकन नाते सांगणारा डोमिनो पिझ्झा!

जेमतेम एक किलोमीटर लांबीचा नेहरु रोड यापुढे विमानतळाजवळून जाणाऱ्या पश्चिम द्रुतगती महामार्गामध्ये विलीन होतो. उजव्या बाजूच्या कोपऱ्यावर एकेकाळी दिमाखात उभे असलेले जाल हॉटेल आता भग्नावस्थेत पाहून जीव कासाविस होतो. या हॉटेलमध्ये भगवान महावीर वा भगवान बुद्ध यांचा एक प्रचंड उंच पुतळा समोरच होता.

विमानतळावर जाणारे उच्चभ्रू पार्लेकर आणि लोकलने प्रवास करणारे मध्यमवर्गीय पार्लेकर या साऱ्यांना सामावून घेत नेहरू रोड गेली शंभर वर्षांहून अधिक काळ वाहतो आहे.

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

# चित्र समिक्षेची साधना

श्रीमती साधनाताई बहुळकर.. विलेपार्ले परिसरात चित्रकला शिक्षिका म्हणून प्रसिद्ध, तर कलाक्षेत्रात चित्रसमीक्षक म्हणून परिचित व्यक्तिमत्व. जन्म अहमदनगरचा. पूर्वाश्रमीच्या साधना खडपेकर. कर्मभूमी विलेपार्ले. पार्ले



टिळक शाळेच्या माजी विद्यार्थिनी. भावंडांमध्ये सर्वात लहान. चित्रकलेची अतिशय आवड होती. घरात मोठ्या भावाला कॅलेंडर्स मधून, मासिकांतून वगैरे दलाल, सातवळेकर यांसारख्या थोर चित्रकारांची चित्रं जमवायचा छंद होता. ही चित्रं पाहून मनात चित्रकलेविषयी कुतूहल निर्माण होऊ लागलं. त्यामुळे रूढ मार्गाने जाण्याऐवजी काही वेगळं करावं.. आर्ट स्कूलला जावं असं त्यांनी ठरवलं. शालान्त परीक्षेनंतर एक वर्षाचा फाउंडेशन कोर्स केला. त्यानंतर आपल्या आवडीप्रमाणे जे जे स्कूल ऑफ आर्ट्स कॉलेजमध्ये पेंटिंग या विषयासाठी Government Diploma In Art या पदविकेसाठी ॲडमिशन घेतली. टीचर्स ट्रेनिंग कोर्सही केला. याच वेळी लेखनाची सुरुवात झाली.

कॉलेजमध्ये असताना जाणवलं होतं की हे काहीतरी वेगळं जग आहे. चित्रं नक्की काय आहे, त्याचा अर्थ, संदर्भ हे सामान्य माणसाला कळण्यासाठी त्याचं समीक्षण होणं आवश्यक आहे. जहांगीर आर्ट गॅलरीमधील चित्रप्रदर्शनाचे समीक्षण हा साधनाताईंचा पहिला लेख होता. लोकसत्ता वर्तमानपत्रात रंग-रेषा हे सदर त्यांनी अडीच वर्ष चालवलं. त्यापूर्वी सत्यकथा मासिकासाठी काही illustrations केली होती. काही काळ म.टा. तसंच मुंबई सकाळ मधूनही समीक्षणात्मक सदर लिहिलं. या वेळेपर्यंत फिल्म्स डिव्हिजनमध्ये नोकरी मिळाली होती आणि लग्नही झालं होतं. लेखनाची मनस्वी आवड होती. पण खूप दगदग होऊ लागली म्हणून लेखन थांबवलं.

फिल्म्स डिव्हिजनमध्ये ॲनिमेशन फिल्म विभागात नऊ वर्षं नोकरी केली. दुसऱ्या कन्येच्या जन्मानंतर घरातून कोणाचीही मदत नसल्यामुळे ही नोकरी सोडून पार्ल्यातच पार्ले टिळक इंग्रजी माध्यम शाळेत कला शिक्षिकेची नोकरी स्विकारली. या नोकरीत स्थिरावणं सुरुवातीला अवघड गेलं. आधीच्या नोकरीत शांतपणे स्वत:चं काम करायची सवय. इथे फक्त पस्तीस मिनिटात काय शिकवणार असं वाटायचं. पण हळूहळू सवय होत गेली. मैत्र जुळलं. शाळेशी, मुलांशी आणि सह अध्यापिकांशी.

कालांतराने संसारात आर्थिक स्थैर्य आलं. मुलींच्या सहवासाची ओढ आणि नोकरीत आलेला तोचतोचपणा यामुळे सोळा वर्षांनी नोकरी सोडली. या काळात अधूनमधून लेखन चालू होतं, पण सारा वेळ घर, मुली आणि नोकरी यातच जात होता. या मधल्या काळात चित्रकला आणि जहांगीर आर्ट गॅलरी यांच्याशी संबंध जवळजवळ सुटल्यासारखा झाला होता. कुणा ओळखीच्या किंवा एखाद्या मोठ्या कलाकाराचं चित्रप्रदर्शन असेल तरच पाहिलं जायचं. पुढे मुली मोठ्या झाल्या तोपर्यंत चित्रक्षेत्र खूप पुढे गेलं होतं. साधनाताईंना ही पडलेली दरी खूप जाणवली. हे क्षेत्र हळूहळू दुरावलं. ही खंत अजुनही वाटते.




शाळेची नोकरी सोडल्यानंतर काही काळ आर्ट सोसायटी ऑफ इंडिया संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभागी



राहिल्या. २००८-०९ पासून लिहिण्याची कामं मिळायला लागली. वेगवेगळी वर्तमानपत्रं, मासिकं, दिवाळी अंक यांसाठी चित्रकार बेंद्रे, हेब्बर, यांसारख्या या क्षेत्रातल्या दिग्गजांच्या मुलाखती घेतल्या, राजा रविवर्मा सारख्या थोर कलाकारांची जन्मशताब्दी वगैरे निमित्ताने लेख लिहिले. अनुभव मासिकातील अमृता शेरगील यांच्यावर लिहलेला लेख उत्तम असा आहे. अशाप्रकारे सन २०२० पर्यंत जवळपास ऐंशी लेख लिहिले.

दर महिन्याला एक चित्रकार निवडून त्याने तयार केलेलं कोणतंही एक मुखपृष्ठ घ्यायचं, त्या चित्रकाराची माहिती, त्याची शैली आणि चित्रासंबंधीचं art appreciation असा छोटा लेख, असा एक प्रयोग अंतर्नाद मासिकासाठी दोन-तीन वर्ष राबवला. वाचकांत रुची वाढवली. कलासमीक्षक म्हणून हे लेखिकेचं वेगळेपण आहे. यासाठी विनया खडपेकर या मोठ्या बहिणीने कायम प्रोत्साहन दिलं. अशाच पद्धतीची सदरं मिळवून साऱ्याजणींनी अनुभव या अंकांसाठी चालवली. लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीत स्टुडिओ हे सदर चालवलं. यादरम्यान महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी सन १९५० ते २००० मधील चित्रकलेवरची पुस्तकं शोधून त्यावर प्रबंध लिहिला.

सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सुहास बहुळकर, कॉलेजमधील मित्र, पुढे शिक्षक, सखा आणि नंतर आयुष्यभराचा सोबती. त्यांनी जहांगीर आर्ट गॅलरीसाठी, मास्टरस्ट्रोक या नावाने दहा प्रदर्शनं केली. त्यातल्या पाच सहा प्रदर्शनांसाठी साधनाताईंनी जहांगीरच्या कॅटलॉगमध्ये प्रत्येक वर्षी एक असं एकेका आर्टिस्टबद्दल लिहिलं. विवेक साप्ताहिकाच्या दृष्यकला कोशासाठी चित्रकला विषयाकरिता सहसंपादकांपैकी एक या नात्याने काही नोंदी लिहिल्या. विश्वकोशासाठीही रेम्ब्रां, जामिनी राय, रोदां, राजा रवी वर्मा अशा चार नोंदी केल्या. संगीतात जशी घराणी आहेत, तशी चित्रकलेत बॉम्बे स्कूल परंपरा आहे. महाराष्ट्रातील या परंपरेचे लेखन अगदी विरळा असे आहे. ते अजून व्हावे यासाठी एशियाटिक सोसायटीने रजनी दांडेकर फेलोशिप सुरु केली. ही फेलोशिप साधनाताईंना मिळाली. १८५७ ते १९५० या काळातील महाराष्ट्रातील चित्रक्षेत्रातील माहिती मिळावी अशी मूळ कल्पना. साधनाताई म्हणतात ''मी या क्षेत्रात चाळीस बेचाळीस वर्षं वावरले. वास्तविक कलेशी स्त्रियांचा संबंध जास्त. रांगोळ्या, विणकाम, भरतकाम वगैरे मार्गांनी स्त्रिया आपली कला व्यक्त करीत पण उंबरठ्याच्या आत राहिल्या.'' चित्रकला क्षेत्रात स्त्रिया खूप कमी असल्याचं जाणवलं. त्या का कमी असतील? साधनाताई शिकत असताना अंबिका धुरंधर, अँजेला त्रिंदाद यांची नाव ऐकली. पण याच दोघी कशा असतील? अजूनही कोणी निश्चितच असतील. त्यांच्या समकालीन अजून कोण असतील? याचा शोध हाच साधनाताईंच्या प्रबंधाचा विषय ठरला. योगायोगाने याच वेळी बॉम्बे आर्ट सोसायटीला १२५ वर्षे पूर्ण झाली म्हणून एक भव्य महत्त्वाकांक्षी प्रदर्शन भरवलं होतं. त्यासंदर्भात सोसायटीचे जुने कॅटलॉग घरी आले. त्यांचा अभ्यास करताना अजून तीन स्त्री चित्रकार मिळाल्या. विमल गोडबोले, मारी हेंडरसन आणि मग्दा नाख्मन. आजवर अपरिचित असलेल्या या पाच स्त्री चित्रकार. त्यांच्या कौटुंबिक जीवनाचा आणि चित्र कर्तुत्वाचा शोध आणि बोध म्हणजे साधनाताईंचा प्रबंध, 'बॉम्बे स्कूल कला परंपरेतील स्त्री चित्रकार'. अतिशय उत्तम प्रकारे अभ्यासपूर्वक तयार झालेला हा शोधप्रबंध पुस्तक रूपानेही प्रकाशित व्हावा असं दांडेकर कुटुंबीयांना वाटलं. त्यांच्या पुढाकाराने राजहंस प्रकाशनच्या मदतीने हा प्रबंध अत्यंत देखण्या पुस्तक स्वरूपात प्रकाशित झाला.

स्त्री कलाकारांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे व्यथित होऊन पुस्तकात साधनाताई विशद करतात, ''त्याकाळच्या स्त्री चित्रकारांचा कस कमी वाटला असेल तर त्यात तथ्य आहे. त्या काळात लहानपणापासून त्यांची वाढ, संगोपन, संस्कार कसे झाले हे लक्षात घेणे आवश्यक होते. प्रदर्शनात सहभाग घेऊन चित्र काढणाऱ्या स्त्रियांची ही पहिली पिढी. त्यांच्याकडून समकालीन पुरुषांच्या कलात्मक गुणवत्तेची अपेक्षा बाळगणे चुकीचे होते''. त्या आशा व्यक्त करतात, 'कालमानानुसार स्त्रियांची मानसिकता बरीच बदलली आहे. करियर त्यांच्या आयुष्याच्या केंद्रस्थानी येऊ लागले आहे. अनेक आर्ट गॅलरीच्या चालक स्त्रिया आहेत. कोशात समावेश नसणाऱ्याच काहीजणी सातत्याने व दर्जेदार कलाकृती निर्माण करीत आहेत. या कलाकारांनी प्रशस्त केलेल्या वाटेचा नवीन पिढीतील स्त्री कलाकार उत्तम हायटेक हायवे करतील हा विश्वास आहे.'

आई-वडील दोघेही चित्रक्षेत्रात असले तरी मुलींनी मात्र वेगवेगळी क्षेत्रे अवलंबली आहेत. मोठी छान्दसी बी ए झाली, एम ए झाली, जापनीज भाषा शिकून हॉंगकॉंगला सेटल झाली आहे. तर धाकटी ऋचा ज्वेलरी मेकिंग आणि बेकिंग या आवडीच्या क्षेत्रांमध्ये मग्न आहे. क्रिमी अफेअर्स हा तिचा ब्रॅंड आहे. सदैव लेखनात मग्न असलेल्या साधनाताईंना पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

GIIT **GOLDEN GATE TO IIT** GIIT
*"Making your dreams come true since 2005"*

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals:** Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice:** Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development:** Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch | Our Top Scorers : 2019 Batch



Abhishek Mungekar IIT Gandhinagar | Anokhi Mehta IIT Bombay | Mihir Dharap IIT Palakkad | Shreyas Nadkarni IIT Bombay | Om Prabhu IIT Bombay | Atharva Varde IIT Guwahati | Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty



Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay — Mathematics | Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay, Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy — Physics | Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay, Prof. Tarun Ahirwar B.Tech ISM Dhanbad — Chemistry

**Contact:** Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
**Address:** Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

# घाणेकर मार्ग म्हणू या ! आझाद रोड नको

दुकानावरील पाट्या मराठीत लिहिल्या जाणे अनिवार्य करण्याच्या दृष्टीने काही निर्बंध लागू करण्याचा महाराष्ट्र शासन विचार करीत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या आहेत. काही लोकांना हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील घाला वाटतो आणि ते न्यायालयात जाण्याचा विचार करीत आहेत. काय होईल ते दिसेलच. पार्लेकरांना ही नामी संधी आहे. त्यांनी योग्यप्रकारे आंदोलन केले तर एका रस्त्यावरील दुकानांच्या पाट्यांमध्ये अपेक्षित बदल ते घडवून आणू शकतात. हा




रस्ता आहे वीर मकरंद घाणेकर मार्ग. ह्या रस्त्याचे आधीचे नाव आझाद रोड. ह्या रस्त्यावर राहणारा सेकंड लेफ्टनंट मकरंद घाणेकर १९७१ च्या पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धात काश्मीर आघाडीवर वीर मरण पत्करता झाला. हुतात्मा झाला. त्याच्या हौतात्म्याला अभिवादन करण्यासाठी महापालिकेने आझाद रोडचे नामकरण तेव्हाच वीर मकरंद घाणेकर मार्ग असे केले. त्या युद्धाला आणि नामकरणाला ह्या वर्षी पन्नास वर्षे पूर्ण झाली. तरीही पार्लेकर 'आझाद रोड' च म्हणतात. रिक्षावाल्यांना घाणेकर मार्ग म्हटलेले कळत नाही. आझाद रोड म्हटले की मगच ते मीटर टाकतात. ह्या रस्त्यावरून बस क्रमांक ३३९ धावते. बस थांब्याचे नाव आहे 'आझाद रोड बस थांबा'. महापालिकेने वीर घाणेकरांच्या पराक्रमाची आणि बलिदानाची दखल घेतली. बेस्ट समितीला त्याची आवश्यकता वाटत नाही. ह्या मार्गावर जी दुकाने आहेत त्यांच्या पाट्यांवर, 'आझाद रोड' असेच लिहिलेले आहे. 'घाणेकर मार्ग' लिहा असे महापालिकेने आम्हाला कळविलेले नाही असे दुकानदार बिनधास्तपणे सांगतात. ह्या रस्त्यावर राहणाऱ्या काही समाजसेवकांनी लोकांनी नामांतर स्विकारावे म्हणून थोडी हालचाल केली. जरा सळसळ झाली. पुन्हा सारे कसे शांत शांत आणि 'आझाद' झाले. आता युद्धाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात बेस्ट समितीने थांब्याचे नाव बदलावे. त्या नामांतराचा समारंभ करावा. समारंभात लोकनियुक्त प्रतिनिधी, पार्ल्यातील विविध संघटना आणि संस्था ह्यांचे प्रतिनिधी ह्यांनी समरसून भाग घ्यावा. भाषणे करावी. सेकंड लेफ्टनंट मकरंद घाणेकर ह्यांची शौर्यगाथा गावी. लोकांनी आझाद रोड म्हणू नये तर वीर मकरंद घाणेकर मार्ग असे स्फूर्तिदायक शब्द खणखणीतपणे आपल्या कंठातून बाहेर काढावेत असे व्यासपीठावरून आवाहन करावे. मकरंद नामाचा गजर करावा. दुकानदारांना




पाट्या बदलण्याचे आवाहन करावे. हळूहळू लोकांना आपली चूक कळेल. आपण वीर मकरंद घाणेकर मार्ग असे म्हणतो तेव्हा सीमेवर देशाच्या

सुरक्षिततेसाठी प्राणांची बाजी लावून पहारा करणाऱ्या सैनिकांच्या पराक्रमाला आणि त्यांच्या पवित्र स्मृतीला आपण उच्च कोटीचे अभिवादन करीत असतो. जेथे सैनिकाचा सन्मान होतो तेथे लाक्षणिक अर्थाने सूर्यास्त होत नाही. लोक जागे असतात. त्यांचा औचित्यविवेक जागा असतो. अशा समाजात घुसण्याचे धाडस करतांना आतंकवादी दहा वेळा विचार करतात. आपण आधी पाकिस्तान निर्माण केल. मग स्वतंत्र झालो. दोनअडीच महिन्यात पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले. आपल्या सैन्याला आपण त्याचे काम करू दिले नाही. परिणामी



काश्मीरचा काही भाग पाकिस्तानात राहिला. पाकिस्तान त्याला आझाद काश्मीर म्हणते. ह्या 'आझाद' काश्मीरचे रूपांतर भारताच्या काश्मीरमध्ये करावे अशी इच्छा आणि प्रयत्न गेल्या ७५ वर्षात आपल्याकडून झाले नाहीत. आपल्या पार्लेकरांकडूनही गेल्या ५०वर्षात आझाद रोडचे नामांतर वीर मकरंद घाणेकर मार्ग असे लोकपातळीवर झाले नाही. ज्याला मुंबईचे पुणे म्हटले जाते त्या विलेपार्ल्याला हे




शोभादायक नाही. ती चूक सुधारू या. वीर मकरंद घाणेकर मार्ग असे म्हणू या. आझाद रोड नको . जय जवान ! जय किसान !!

**अरविंद विठ्ठल कुळकर्णी**
**९६१९४३६२४४**

# शकुंतला नामजोशी ह्यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी निधन



प्रसिद्ध पत्रकार आणि युद्धविषयक विश्लेषक दिवंगत मिलिंद गाडगीळ ह्यांच्या सासूबाई श्रीमती शकुंतला गोविंद नामजोशी ह्यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी पार्ल्यातील रामानंद गृहनिर्माण संस्थेतील त्यांच्या राहत्या जागी पाच जानेवारीला निधन झाले. त्यांच्यामागे एक मुलगा आणि एक मुलगी आहे. त्यांच्या एका मुलाचे काही वर्षांपूर्वी अमेरिकेत निधन झाले. त्यांचे यजमान मुंबई महापालिकेत शिक्षक होते. शकुंतलाबाई मूळच्या गिरगावच्या. खोताच्या वाडीतल्या. व्ह. फा. म्हणजे इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण. शिवणकामातील पदविका परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नामजोशी घराण्यातील त्या पहिल्या ० त्याच्या शिवणकामातील प्राविण्याने पुढील आयुष्यात त्यांना मोठा लौकिक आणि सांपत्तिक आधार प्राप्त झाला. त्या वाचनवेड्या होत्या आणि खांडेकरी वाङ्मयाचा त्यांच्यावर प्रभाव होता. अनेक कवींच्या अनेक कविता त्यांना तोंडपाठ होत्या. नऊवारी नेसणाऱ्या ज्या थोड्या बायका पार्ल्यात आपले अस्तित्व टिकवून आहेत त्यांच्या त्या उत्तम प्रतिनिधी होत्या. सणासुदीच्या दिवसात लोकांना मोदक खाण्याची इच्छा होते तेव्हा त्यांना आपल्या पाककृतीची आनंदाने आठवण होते ह्यात त्यांना इतिकर्तव्यता वाटत असे. आनंदी स्वभाव, पडतील ते कष्ट कुरकुर न करता उचलण्याची सिद्धता आणि भरपूर चालणे ह्यामुळे मधुमेह, रक्तदाब आणि अन्य म्हातारपणाचे आजार ह्यापासून त्या अलिप्त होत्या. शेवटपर्यंत त्यांना चष्मा नव्हता. शेवटचे वर्ष त्यांना काहीसा स्मृतिभ्रंश होत असे. एरव्ही त्या खुटखुटीत आणि खडखडीत होत्या. सोमवारी शिवलीलामृताचे वाचन हा त्यांचा नेम होता. पण त्या अंधश्रद्धाळू नव्हत्या.

अडीअडचणीला आधार देऊन उभे केले आणि मार्गाला लावले अशा शंभराहून अधिक माणसांची कृतज्ञता हीच त्यांची मिळकत होती आणि तेच त्यांचे आध्यात्म होते.

**अरविंद विठ्ठल कुळकर्णी**
**९६१९४३६२४४**

# टाऊन हॉल - एशियाटिक लायब्ररी







**वास्तु वैभव**

ब्रिटिशांनी मुंबईची स्वत:च्याच सोयीनुसार व आवडीनुसार जेव्हा पुर्नबांधणी सुरू केली तेव्हा ब्रिटिशांच्या संस्कृतीनुसार बांधलेली महत्त्वाची वास्तू म्हणजे टाऊन हॉल. १८३३ साली ही वास्तू बांधून पूर्ण झाल्यापासून ती मुंबईच्या सभ्यतेचे प्रमुख केंद्र बनली आहे. महत्त्वाचे राजकीय व सामाजिक प्रश्न इथेच चर्चिले जात. तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित केले जात.

टाऊन हॉलची रचना आपण बघतो तेव्हा पहिल्यांदाच नजरेत येतं प्रमुख प्रवेशद्वारासमोरील तीस प्रशस्त व प्रदीर्घ पायऱ्या. पायऱ्या चढू लागण्यापूर्वी पहिल्याच पायरीवर चौकोनी शीला बसवलेली आहे. त्यावर '0'कोरलेला आहे. मुंबई शहराची 0 पातळी म्हणजेच समुद्रसपाटीची पातळी दाखवण्याची ती अधिकृत खूण आहे. तिला टॅडम किंवा बेंच मार्क म्हणतात. टाऊन हॉलच्या पायऱ्या चढू लागलो की घडीव लोखंडाचे दोन्ही बाजूंचे कठडे दिसतात. आज काळाच्या ओघात त्यांची दुर्दशा झाली आहे. संध्याकाळी या पायऱ्यांवर अनेक विद्यार्थी अभ्यास करताना दिसतात. रात्रीही तिथल्या दिव्यांच्या प्रकाशात त्यांचा अभ्यास सुरू असतो. तेथून वर पाहिले की ब्रिटिश साम्राज्याच्या सामर्थ्याचे प्रतीक असेच जणू अशी वास्तू सामोरी येते. दोनशे फूट लांब व शंभर फूट रुंद अशा प्रासादतुल्य इमारतीचा दर्शनी भाग तीन व्हरांडेवजा मंडपात विभागला आहे. जुन्या 'दोरिक' आणि ग्रीक शैलीतील आठ स्तंभ नजर खिळवून ठेवतात. इथली दारे खिडक्या सागवानी लाकडाची असून पश्चिमाभिमुख आहेत. त्यांच्या वारा, ऊन, पाऊस यांचे नियंत्रण करण्यासाठी वर-खाली होणाऱ्या झडपा व त्यावरील घुमटाची संरक्षण टोपी इमारतीचे सौंदर्य वाढवतात.

**संगीता बेहेरे**
**९८६७७५८३१०**

# नामवंत छायाचित्रकार प्रा. श्रीकांत मलुष्टे



आपण कॉलेजला गेल्यावर अनेक प्राध्यापक भेटतात. काहींचे शिकवणे चांगले असते तर काही यथातथाच असतात. विषय उत्तम शिकवणारे प्राध्यापक आपल्या स्मरणात राहतात.साठ वर्षांपूर्वी पार्ले कॉलेजमध्ये (आताचे साठ्ये कॉलेज) शिकत असताना आम्हाला फिजिक्स विषय शिकवणारे एक प्राध्यापक भेटले आणि ते शिकवण्याच्या उत्तम धाटणीमुळे कायमचे लक्षात राहिले आणि ते म्हणजे प्रा. श्रीकांत मलुष्टे. मैत्रीचे काही योगायोग असतात.प्रा. मलुष्टे यांच्या बाबतीत असेच झाले. कॉलेजनंतर त्यांची व माझी जवळपास सोळा वर्षे भेट नव्हती. त्यांचे वृत्तपत्रात येणारे फोटो आणि फोटोविषयक सदरे मी पहात होतो आणि मग माझ्या पुष्कळा नावाच्या दिवाळी अंकांच्या निमित्ताने त्यांच्याशी संपर्क साधला. अंकासाठी सतत ९वर्षे ते फोटोग्राफी विषयक लेख लिहून देत होते.यातून आम्ही एकमेकांचे खूप जवळचे मित्र बनलो. नुकतेच मलुष्टे सरांचे वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले आणि अनेक आठवणी मनात उफाळून आल्या. मलुष्टे सर हरहुन्नरी होते. रत्नागिरीत कॉलेजमध्ये शिकत असतानाच अनेक गोष्टींची आवड निर्माण झाली होती. चांगली पुस्तके वाचण्याबरोबर ते एकांकिकामध्ये काम करु लागले. पुढे मुंबईत आल्यावर त्यांनी नाट्यविषयक प्रशिक्षण घेतले. प्राध्यापिकी करीत असताना एका व्यावसायिक नाटकात राजा परांजपे, सतीश दुभाषी, आशा पोतदार अशा नामांकित कलाकारांबरोबर काम केले, २७ डाऊन या हिंदी चित्रपटात छोटी भूमिका वठवली. अभिनेत्री रेखा सबनीस यांच्या साथीने अभिव्यक्ती नावाची संस्था काढून काही प्रायोगिक नाटके केली. पुढे महाराष्ट्र कॉलेजमध्ये कलाप्रेमी मित्र भेटले. जहांगीर गॅलरीमध्ये पेंटिंग्ज पहात असताना त्यांच्यामधील फोटोग्राफीचा अंकूर वर आला आणि ते फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडियाचे सदस्य झाले.हा त्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉइंट ठरला. सोसायटीच्या फोटोग्राफी स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागले. त्यांनी फोटोग्राफी विषयाचा अभ्यास केला. चांगल्या छायाचित्रकारांची चित्रे पाहून लाइट्स, एक्सप्रेशन्स, कंपोझिशन कसे हवे ते शोधले. आता ते चांगली फोटोग्राफी करु लागले.फोटोंना बक्षिसे मिळू लागली. सलग दोन वर्षे फोटोग्राफर ऑफ द इयर झाले. अभ्यासातून छंद वाढवत नेला आणि ते कल्पक छायाचित्रकार बनले. आपले फोटोग्राफीचे ज्ञान, अनुभव इतरांना द्यायला हवा या उर्मीतून त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफीमध्ये अनेक वर्षे शिकवले.नंतर स्वत:ची स्नॅप नावाची संस्था काढली. फोटोग्राफीचे शिक्षण घेतलेले त्यांचे हजारो विद्यार्थी महाराष्ट्रात आहेत.त्याचबरोबर त्यांनी मुंबई सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सामना या मराठी आणि मिड् डे, टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वृत्तपत्रात फोटोग्राफी विषयक सदरे चालू केली आणि त्यामधून फोटो कसे काढावे याचे तंत्रासह मार्गदर्शन करु लागले. आता माझ्या आणि त्यांच्या मैत्रीविषयी. माझा मित्र चौफेर प्रकाशनाचा भास्कर काणेकरला त्यांचे फोटोग्राफी विषयक पुस्तक काढायचे होते. त्यानिमित्ताने त्यांच्या दादरच्या फोटोग्राफी क्लासमध्ये आमच्या अनेक भेटी झाल्या.परंतु सरांच्या अनेक कामांमुळे ते जमत नव्हते. दरम्यान भास्करचे अपघाती निधन झाले आणि ते पुस्तक दुसऱ्या प्रकाशकाने काढले. त्या



पुस्तकाच्या निमित्ताने आणि नंतरच्या दोन पुस्तकांच्या वेळी आमचे सतत बोलणे व्हायचे.मी जमेल तसे मार्गदर्शन करीत होतो. मात्र या सर्व कामामुळे त्यांचा माझ्यावर एवढा विश्वास बसला की त्यांनी मला तिन्ही पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात वक्ता म्हणून बोलण्याची संधी दिली आणि तीही मधु मंगेश कर्णिक, सुभाष भेंडे, अरुण टिकेकर, अधिक शिरोडकर, अविनाश सुपे अशा मान्यवरांबरोबर. त्यांचे ‘असा मी, तसा मी’ या आत्मचरित्राचे प्रकाशन तर त्यांनी रत्नागिरी इथे माझ्या हस्ते केले.माझी योग्यता नसताना केवळ माझ्यावरील प्रेमाखातर त्यांनी हे केले होते. त्यांच्या तत्वनिष्ठ स्वभावाचे दोन अनुभव-एकदा एका बेस्टच्या ड्रायव्हरने त्यांना किरकोळ कारणावरून शिवीगाळ केली तर त्याची तक्रार वरपर्यंत नेली आणि त्याला समज द्यायला लावली. दुसरे आपल्या राष्ट्रगीतातील सिंध या शब्दाविषयी. आपल्या राष्ट्रगीतात सिंधु असा शब्द आहे पण आपण बोलताना पंजाब सिंध असे म्हणतो, त्यावर त्यांनी जनहित याचिका (PIL) दाखल केली आणि त्याचा पाठपुरावा माझ्या एका ओळखीच्या मराठी खासदाराकडून केला. त्यासाठी ते अगदी शेवटपर्यंत लढत होते. साधारण कलाप्रिय माणूस अशा फंदात पडत नाही पण त्यांना त्याची फिकीर नसायची. अशा वेळखाऊ बाबींवरुन मी कधी छेडले तर ते हसण्यावारी नेत. प्रा. मलुष्टे यांनी आपल्या शिक्षकी पेशाची सुरुवात पार्ले टिळक विद्यालयात केली. पुढे पार्ले कॉलेज आणि नंतर महाराष्ट्र कॉलेजमध्ये शिकवले.ते राहायला अंधेरी पश्चिमला असले तरी त्यांची कर्मभूमी ते सांस्कृतिक पार्ल्याला मानत होते. पार्ल्यात त्यांचे माझ्यासारखे अनेक विद्यार्थी आहेत. त्यांना त्यांचा प्रेमळ, लाघवी स्वभाव नक्की आठवत असेल! मलुष्टे सरांच्या अनेक छायाचित्रांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले. वृत्तपत्रांमधून खूप प्रसिद्धी मिळाली. असा हा नामवंत छायाचित्रकार आज आपल्यात नाही, मात्र त्यांच्या कल्पक छायाचित्रांच्या रुपाने ते कायमचे बरोबर राहणार आहेत. माझ्या या ज्येष्ठ मित्राला ही शब्द श्रध्दांजली!

**अशोक बेंडखळे**

९८६९२५८५८५





ज्योतिशास्त्र, वास्तूशास्त्र आणि विज्ञान यांच एक पांपरिक अभ्यास

गुरूजी

श्री. शुभम शास्त्री

ज्योतिशपांडित, वास्तुतज्ञ व आध्यत्मिक काय

(गंगापूर, कर्नाटक)


कुंडली परीक्षण, वास्तू परीक्षण, वास्तूला तोडफोड व इजा न करता वास्तूसल्ला वधू-वर कुंडली मिलन व त्या प्रमाणे योग्य मार्गदर्शन, मुलांसाठी करिअर गुईडन्स नौकरी व व्यवसाय या बदल योग्य मार्गदर्शन कुंडली प्रमाणे योग्य भाग्य रत्न सल्ला

सर्व पूजा विधी कार्य पारंपारिक व शास्त्रज्ञा पदतीनी केलेल्या जातात

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे

अपॉइंटमेंट साठी संपर्क

८३६९२०२८२० / ९८१९२१०९९५




जन्म कुंडली बनवून मिळेल

# डॉ. सावंत यांच्या पुस्तकांनी दिला जंगलभ्रमंतीचा सुंदर अनुभव- मुख्यमंत्री

**डॉ. दीपक सावंत लिखित 'वाईल्ड लाईफ फोटोबायोग्राफी' आणि 'उद्धव ठाकरे- द टायगर' या दोन पुस्तकांचे सुभाष देसाई यांच्या हस्ते प्रकाशन**

मुंबई दिनांक २९: छायाचित्रणाला एक चिकाटी आणि जिद्द लागते ती डॉ. दीपक सावंत यांच्यात असून त्यांच्या आजच्या या पुस्तकामुळे त्यांच्यासमवेत केलेला जंगल भ्रमंतीचा अनुभव, ती दृष्ये जशीच्या तशी डोळ्यासमोर उभी राहिली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.





राज्याचे माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी लिहिलेल्या –'वाईल्ड लाईफ फोटोबायोग्राफी' आणि 'उद्धव ठाकरे- द टायगर' या दोन पुस्तकांचे प्रकाशन उद्योग मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते आज करण्यात आले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची या कार्यक्रमास दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थिती होती. कार्यक्रमास जेष्ठ छायाचित्रकार मोहन बने, प्रकाशक आनंद लिमये यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आजवर अनेक प्रकाशने झाली, पण आजचा प्रकाशन कार्यक्रम वेगळा आहे. डॉ.दीपक सावंत यांना छायाचित्रकार, लेखक म्हणून एक वेगळी ओळख देणारा हा कार्यक्रम आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी डॉ. दीपक सावंत यांच्यासमवेत केलेल्या अनेक जंगल भ्रमंतींचा आपला अनुभव यावेळी सांगितला. ज्या कान्हा जंगलापासून वाईल्ड फोटोग्राफीला आपण सुरुवात केली तिथे फिरत असताना वनरक्षकांच्या असलेल्या अडीअडचणी जाणवल्या, त्यातून आरोग्य शिबीराचे आयोजन, रुग्णवाहिकेची उपलब्धता, औषधांची उपलब्धता अशा अनेक बाबींच्या पूर्ततेत डॉ. सावंत यांनी केलेले कामही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वनरक्षकांच्या अनेक अडचणी असतात, त्यांच्या आरोग्याचे, कुटुंबाचे आणि मुलांचे शिक्षणाचे प्रश्न खूप वेगळे असतात हे या जंगल भ्रमंती दरम्यानच कळाल्याचे ते म्हणाले. वन्यजीवांना आपण त्रास दिला नाही तर ते आपल्याला त्रास देत नाहीत, इथे वावरण्याची एक शिस्त असते असे स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले की, डॉ. सावंत यांनी कॅमेऱ्यानेच नाही तर लेखणीने जंगल टिपले असल्याचे या दोन पुस्तकांवरून दिसून येते.

पुस्तक प्रकाशनासाठी डॉ. सावंत यांचे अभिनंदन करून श्री. देसाई म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी जंगल भ्रमंतीबरोबर गडकिल्ल्यांचे, वारीचे छायाचित्रण करतांना जीव ओतून काम केल्याचे दिसते. यातून जगप्रसिद्ध छायाचित्रकार



म्हणून उद्धव ठाकरे यांची ओळख निर्माण झाली. येथे मिळालेला संयम, अनुभव आणि शांत राहून 'क्लिक' करण्याची निर्णय क्षमता त्यांना मुख्यमंत्री पदाच्या वाटचालीत उपयोगी पडत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातच नाही तर देशात लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून त्यांची दुसऱ्यांदा निवड झाली. कोरोना काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्व यंत्रणांना योग्य दिशा दिली, सगळ्या यंत्रणांना समवेत घेऊन काम केले. याची दखल जागतिक आरोग्य संघटनेसह अनेक संघटनांनी घेतली. त्यामुळे अशा व्यक्तीसमवेत छायाचित्रण करायला मिळणे, जंगलभ्रमंती करायला मिळणे भाग्याची गोष्ट आहे. ते भाग्य डॉ. सावंतांना लाभले. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासमवेत केलेल्या जंगलभ्रमंतीचा आपला अनुभव या पुस्तकांच्या आणि छायाचित्रांच्या माध्यमातून सांगितला आहे.




आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ. दीपक सावंत यांनी उद्धव ठाकरे यांच्यासमवेत केलेल्या जंगल भ्रमंतीचा आणि त्यांच्यासमवेत केलेल्या छायाचित्रण कलेचा अनुभव सांगितला. ते म्हणाले की, वन, जंगल वाचवण्यासाठीचा उद्धव ठाकरे यांचा आग्रह आणि काम यानिमित्ताने जवळून पहाता आले.. माझ्यासह सुरेश प्रभू, सुभाष देसाई, संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांसमवेत जंगलभ्रमंती केली आहे. त्यावेळी त्यांच्यातील माणूस आम्हा सर्वांनाच जवळून पहावयास मिळाला. ते आपले या क्षेत्रातील गुरु आहेत. फोटोग्राफी करतांना ते अतिशय बारीक गोष्टींची काळजी घेतात हे जाणवले.. पर्यावरणीय बदलाचे परिणाम थोपवण्यासाठी जंगले, वने वाचली पाहिजेत, असेही ते म्हणाले. डॉ. सावंत यांनी उद्योग मंत्र्यांसमवेत कोविड सेंटर, महारक्तदान शिबीरात काम करता आल्याचा आनंदही व्यक्त केला.






# वाघांच्या आयुष्यावर बोलू काही – भाग ३

## माहित नसलेल्या रंजक गोष्टी

दोन-तीन वर्षांपूर्वी ताडोबाला जायचे असे ठरल्यावर माझ्या फोटोग्राफर मित्राला (त्याचेही नाव संजय) फोन केला. 'आपल्या सर्व अभयारण्यात हगमार्क आणि पगमार्क शिवाय काहीच दिसत नाही', संजय म्हणाला. शालजोडीतील शेरे मारणाऱ्या संजयची भाषा सुद्धा कोल्हापुरी जेवणासारखी तिखट आहे. बऱ्याच लोकांचा हाच समज थोड्याफार प्रमाणात



आहे. आपल्याला कामातून रजा / वेळ मिळेल तेव्हा जंगलात धाव घेऊन वाघ दिसत नाहीत अथवा ही फसवणूक आहे असे समजणाऱ्या लोकांचा वर्ग फार मोठा आहे. जंगलात वाघ पाहण्यासाठी वर्षातील ठराविक काळात गेले तरच तो दृष्टीस पडण्याची शक्यता खूप प्रमाणात वाढते. साधारणत: जुलै ते सप्टेंबरपर्यंत बरेचसे व्याघ्र प्रकल्प बंद असतात. पाणवठा हा जंगलातील वन्यजीवांच्या वावराचा केंद्रबिंदू असतो. बहुदा सर्वच जंगलात भरपूर प्रमाणात पाऊस होत असल्याने ऑक्टोबर ते मार्च पर्यंत जंगलातील दुर्गम भागात प्राण्यांसाठी मुबलक प्रमाणात पाणी असते. अशावेळी प्राण्यांचे दर्शन खूप दुर्लभ असते. मे-जून मध्ये अनेक पाणवठे/ जलाशय आटतात आणि मोजकेच शिल्लक राहतात. चरून झाल्यावर तृषार्त जनावरे पाण्यावर येतात आणि नेमक्या ह्याच गोष्टींचा फायदा वाघासारखे मांसभक्षी प्राणी घेतात. लपून राहून ते बेसावध असणाऱ्या किंवा पाणी पिणाऱ्या जनावरांवर हल्ला करतात. दुसरे म्हणजे वाघाला उष्णता सहन होत नाही. तेव्हा अशा शिल्लक असलेल्या जलाशयात वाघ दुपारभर डुंबताना दिसतात. उन्हाळ्यात पानगळीमुळे अनेक झाडे उघडी-बोडकी होतात. काही डेरेदार आणि बारमाही पाने असलेल्या झाडांच्या सावलीतही वाघ आराम करताना दिसतात. जाणकारांना या जागा अनुभवाने माहिती असतात.सांगायचा मुद्दा हाच की जंगलात आपल्याला जो प्राणी पाहण्याची इच्छा आहे त्याच्या सवयींचा बारकाईने अभ्यास करून भेट देणे श्रेयस्कर. एखाद्या जाणकार माणसाबरोबर सफारी करणे फायदेशीर ठरते.

म्हणूनच जून मधील एका संध्याकाळी ताडोबामध्ये भटकंती चालू होती. नुकतीच वळवाची सर येऊन गेली होती. वळवाचा पाऊस अवेळी गाठतोच. भिजवून पटकन निघून जातो. आजही तसेच झाले. पाऊस थांबल्यावर सायंकाळचे कोवळे ऊन पडले होते. इतक्यात पंढरपौनी भागात वाघाने रेडा मारल्याची बातमी वनरक्षकाने दिली आणि आम्ही तिथे निघालो. तेथे रस्त्याच्या बाजूला असलेल्या शुष्क नाल्यापलीकडे बांबूच्या घनदाट बेटात वाघाने एक मस्तवाल रेडा मारला होता. आम्ही पोहोचलो तेव्हा त्याने नुकतीच भोजनाला सुरुवात केली होती. वाघ जेवण टापटीपीने करणारा आहे. सर्वप्रथम तो सावजाची शेपटी चावून तोडून टाकतो. झालेल्या भोकातून पंजा घालून आतडी काढून दूरवर नेऊन टाकतो आणि मग भोजनाला सुरुवात करतो. बिबळ्या मात्र शिकार केल्यानंतर लगेच अधाश्यासारखा खाणे सुरु करतो. खाताना आतडी, अर्धवट पचलेले अन्न, मैला सगळे एकत्र होऊन राडा होतो. शिकार कोणी केली हे यावरून जाणकार ओळखतात.

एका बैठकीत वाघ साधारणपणे २२-२५ किलो मास खातो. मारलेला एक रेडा साधारणपणे १ आठवडा पुरतो. पोटभर खाल्ल्यावर वाघ एखादा आठवडा काही न खाता फिरू शकतो. प्रत्येक शिकारीचा प्रयत्न सफल होईल अशी आपली समजूत असेल तर तुम्हाला कदाचित ऐकून आश्चर्य वाटेल की सर्वात तरबेज वाघ केवळ २०% वेळाच यशस्वी होतो. वाघाला जसे बळ दिले आहे तसेच तृणभक्षी प्राण्यांना बुद्धी, चपळता, शक्तिशाली नाक, कान किंवा तीक्ष्ण नजर दिली आहे. निसर्गाने कोणत्याच जीवावर अन्याय केला नाहीये. मांसभक्षी प्राणी निर्माण करून दुबळे प्राणी जाऊन त्यांची जागा सशक्त प्राण्यांनी घ्यावी आणि अन्नाच्या उपलब्धतेनुसार संख्या मर्यादित राहावी.




वाघाचे नाक अतिशय कार्यक्षम असते हा समज तितकासा बरोबर नाही. शिकार करताना वाघ आपल्या नजरेवर, श्रवणशक्ती आणि बळावर अवलंबून असतो. हरणे, सांबर यांसारख्या प्राण्यांजवळ कार्यक्षम नाक असते. त्यामुळे वाघाचा वास लागताच ते पळ काढतात. वाघालाही हे पूर्ण ज्ञात असते. त्यामुळे तो वाऱ्याची दिशा पाहूनच हल्ला करतो. नाकावर असलेल्या अतिशय संवेदनशील मिशा त्याला वाऱ्याची दिशा अचूकपणे सांगतात. वारा भक्षाकडून आपल्याकडे वाहत आहे याची काळजी घेत दबकत दबकत शक्य तितक्या जवळ जातो. ३५ मैल वेगाने वाघ फारच थोडा वेळ पाठलाग करू शकत असल्याने ज्यास्तीत ज्यास्त जवळ जाऊन, सावज बेसावध असताना अचानक हल्ला करून गर्भगळीत करणे यावर भर देतो. पाठलाग करताना वाघाला त्याची रंगसंगती आजूबाजूच्या परिसरात बेमालूमपणे मिसळून जायला मदत करते. स्पंजसारखी गादी असणाऱ्या पावलांमुळे पाठलाग करताना बिलकुल आवाज होत नाही. त्यात भर म्हणून की काय पाठलाग करतेवेळी वाघ बरोबर पुढील पावलांच्या जागी मागील पावले ठेवत चालतो. त्यामुळे काट्या, वाळलेली पाने याचा आवाज होत नाही. वाघ दोन प्रकारे भक्ष्याला मारतो. त्यातील पहिला प्रकार म्हणजे मानेवर उडी मारल्यावर महाशक्तिमान जबड्याने मान पकडून ठेवतो. आपले पंजे पाठीत रुतवून सावज ज्या दिशेला पडत असेल त्याचा विरुद्ध दिशेला वजन टाकतो. मानेच्या मणक्यांवर दोन विरुद्ध दिशेने आलेल्या बलाने सावजाची मान तुटते आणि समजायच्या आत मृत्यू ओढावतो. दुसऱ्या प्रकारात गळ्याला चावा घेऊन श्वासनलिका किंवा मोठी रोहिणी तोडतो. या प्रकारात सावज तडफडून मरते. निसर्गाने वाघाला १० सेंमी. लांब नख्या आणि ७.५ सेंमी नख्या ही अस्त्रे यासाठीच बहाल केली आहेत. अर्थात मगाशी सांगितल्याप्रमाणे सावजाकडेही चपळ आणि वेडेवाकडे पळण्याची कला, तीक्ष्ण नाक आणि कान या गोष्टी असतात. दोन तुल्यबळ संघात ठराविक दिवशी कोणाचा खेळ सरस होईल यावर विजय अवलंबून असतो तसाच हा प्रकार! आणखी एक महत्वाची गोष्ट सावजात आढळते. ती म्हणजे एकमेकांना इशारा देऊन सावध करणे. मोर आणि इतर पक्षी, झाडावर उंच बसून टेहेळणी करणारी माकडे, हरणे, सांबरे वाघ शिकारीसाठी निघाला असताना विशिष्ठ आवाज काढून एकमेकांना सावध करतात आणि वाघाचे शिकारीचे प्रयत्न धुळीला मिळवतात. आपल्याकडे नाही का प्रबळ राजकीय पक्षाविरुद्ध छोटे आणि दुर्बल पक्ष एकत्र होऊन एकमेकांना मदत करतात?

वाघ कसलेला शिकारी असला तरी तो लबाड आणि वस्तादही आहे. शिकारीसाठी तुम्हा-आम्हाला माहित नसलेल्या क्लुप्त्या सुध्दा तो वापरतो. हरीण आणि सांबाराची मादी जवळ येऊन तावडीत सापडण्यासाठी नरांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल केल्याच्या नोंदी जिम कॉर्बेट आणि केनेथ अँडरसन सारख्या जगप्रसिद्ध शिकारी / अभ्यासकांनी नोंदून ठेवल्या आहेत. नाकाची अकार्यक्षमता भरून काढण्यासाठी एकांड्या लांडग्याबरोबर युती केल्याचे दाखलेही आहेत. यात लांडगा सावजाच्या वासावरून वाघाला तेथे घेऊन जातो आणि बदल्यात शिकारीतील थोडा वाटा मिळवतो. शक्तीला युक्तीची जोड अधिकच मारक ठरते.

वाघ आणि माकडे यांच्या एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या क्लुप्त्या ऐकल्या तर थक्कच व्हाल. माकडाची टोळी तरुण आणि विश्वासू नरांना पहारा देण्यासाठी निवडते. एक नर उंच शेंड्यावरून एकाग्रपणे टेहेळणी करत असतो. ठराविक वेळानंतर त्याची ड्युटी बदलते. वाघ दिसल्यावर पहाऱ्यावरील नर विशिष्ठ आवाज काढून धोक्याची सूचना देऊन सावध करतो. त्यासरशी सर्व टोळी उंचउंच फांद्यांवर जाऊन बसते. वाघाला उंच झाडावर चढता येत नाही. अर्थात वानर हा वाघाच्या मेनूवरील सर्वात चमचमीत पदार्थ. वाघाने हा मेनू मिळवायची युक्ती शोधून आत्मसात केली आहे. लांबूनच डरकाळी फोडत तो झाडावर धावून जातो आणि झाडावर चढायचे ढोंग करतो. वास्तविक वाघाला झाडावर चढता येत नाही



आणि आपण उंचावर शांतपणे बसून राहिलो तर धोका नाही हे एरव्ही कुशाग्र असलेली माकडे त्याक्षणी मात्र विसरतात. या झाडावरून त्या झाडावर अथवा उंचावरून जमिनीवर उड्या टाकताना जखमी झालेले एखादे माकड मग वाघाला आयतेच सापडते.

खरंच, आम्हा जंगल प्रेमींना स्थानिक आदिवासी लोकांकडून ऐकताना, वाचताना जो आनंद मिळतो तो अवर्णनीय आहे. आपल्या

पान ८ वर

TTT AMUSE TOURS

Amuse Hub Holidays | TRIGUN TOUR & TRAVELS TTT

Island Tour Mahad / एक रात्र बेटावर - 26/27 February

A Dream Village Tour - Karjat - 27 February

Statue of Unity – Vadodara - 3 to 6 March

अक्कलकोट गाणगापूर तुळजापूर पंढरपूर - 4 ते 6 फेब्रुवारी / 3 to 6 मार्च

Hurda Party Wai - A Village Tour - 18/19/20 February

Popti Party Alibaug - 12/13 March

Chikoo Safari Gholwad - 12/13 February

Bollywood Holi festival - N D Studio Tour - 18 March

Assam Meghalaya - 7 to 13 March /18 to 24 April

A Heavan – Kashmir - Tulip Festival - 11 to 17 April

Shimla-Manali Manikaran Kasol - 20 to 27 March

Himachal Shimla Manali - 2 to 8 May

9579240836 / 9833992699

# सिलोलीची अद्भुत दुनिया - १

देशोदेशी

बोलिव्हियातील उयुनीचे मिठाचे पठार ओलांडून तुम्ही जर दक्षिणेला चिले देशाच्या सीमेकडे जाऊ लागला तर थोड्याच काळात सिलोली वाळवंटाच्या अद्भुत प्रदेशात जाऊन पोचता. पण पहिले काही मैल आजुबाजूचा खडकाळ, वैराण, शुष्क प्रदेश, सानक्रिस्तोबल सारखी कळाहीन गावं, त्यातील धुळीत माखलेली घरं पाहून आपण हा उपद्व्याप का करतो आहोत असा प्रश्न आपल्यालाच पडतो. त्यातच हा संपूर्ण प्रदेश समुद्र सपाटी पासून जवळजवळ ४५०० मीटर (१४७०० फूट) उंचीवर असल्यामुळे बोचरी थंडी तुमचे लचके तोडत असतेच.

आपल्याला निसर्गाचे काय काय चमत्कार सामोरे येणार आहेत ह्याची पहिली झलक दिसते सान क्रिस्तोबल मागे टाकल्यावर.

कल्पना करा दोन्ही बाजूला १८-२० हजार फूट उंच शिखरं, त्यामधून वाहणारी रुंद नदी. पण नदीत पाण्याऐवजी उकळता लाव्हा वाहातो आहे आणि एका क्षणी तो लाव्हा थंड होऊन गोठून गेला तर काय मागे राहील? मागे राहील एक दगडांची नदी. व्हॅलेदरोकास (मराठीत दगडांची दरी) अशीच एक थिजलेली दगडांची नदी आहे काठावर उभं राहिलं तर असंच भासतं कि



कुठल्याही क्षणी एक प्रचंड गडगडाट करून हा दगडांचा प्रवाह पुन्हा वाहू लागेल आणि शतकानुशतकाच्या वादळवाऱ्यांनी घासून, तासून ह्या दगडांतून अकल्पनीय आकारांची शिल्पं निर्माण केली आहेत.

सिलोली वाळवंटाचा सर्वच प्रदेश



ज्वालामुखींच्या उद्रेकातून निर्माण झालेला आहे. आज आपल्याला माहित असलेल्या, जगातील सर्वात मोठ्या १० सुपर-व्होल्कॅनो पैकी ५ ह्या भागात (सिलोली, अटाकामा) आहेत. सुपर-व्होल्कॅनो म्हणजे असा ज्वालामुखी ज्यातून (जेंव्हा त्याचा स्फोट होईल तेंव्हा) १००० घन कि. मी. पेक्षा जास्त घनफळाचे पदार्थ (लाव्हा, दगड, धूळ इत्यादी) फेकले जाऊ शकतात. सुपर-व्होल्कॅनोच्या स्फोटात संपूर्ण पृथ्वीचं वातावरण बदलून टाकण्याची किंवा संपूर्ण सजीव प्रजाती नामशेष करण्याची क्षमता असू शकते. अर्थात सुपर-व्होल्कॅनोचे स्फोट काही दररोज होत नाहीत. आमच्या प्रवासाचा मार्ग ज्या दोन सुपर-व्होल्कॅनोच्या क्षेत्राजवळून गेला (पास्तो सग्रांदेस आणि सेरोग्वाचा) त्यांचा शेवटचा उद्रेक सुमारे १७ लाख वर्षांपूर्वी झाला असावा. पण ह्या भूतकाळातल्या उलथा पालथींच्या अनेक खुणा मात्र आजही आपल्याला दिसतात. व्हॅले दरोकासही त्यातलीच एक.

पण व्हॅले दरोकास मागे टाकून सिलोलीच्या ह्या निर्मनुष्य (तीन दिवसांच्या ह्या प्रवासात फक्त जेवायला आणि रात्र काढायला ज्या सरायांमध्ये आम्ही थांबलो केवळ तेंव्हाच आम्हाला दुसऱ्या माणसाचं दर्शन झालं), वैराण वाळवंटात तुम्ही पुढे निघाल्यावर पहिली गोष्ट दिसते ती डोक्यावरच्या टोपीत पिसांचा तुरा खोवल्यासारखं दिसणारं ओलाग्यु ह्या सध्या जागृत असलेल्या ज्वालामुखीचं २०००० फूट उंच शिखर आणि त्याच्या मुखातून सतत आकाशात फेकल्या जाणाऱ्या शुभ्र वाफेचा झोत. येथून पुढे हितो काहोनेला सीमापार करून चिले मध्ये शिरेपर्यंत ओलाग्यु सारखे जागृत आणि तोमासमील, लिकानकॅबर, कनापा, तापाकिलचा सारखे सुप्त ज्वालामुखी सतत आपली सोबत करतात.

सिलोलीचा हा प्रदेश (आणि त्यालाच जोडून असलेलं चिले देशातील अटाकामाचं क्षेत्र) जगातील सर्वात कमी पावसाची जागा आहे. पण ह्या शुष्क प्रदेशावर निसर्गाच्या कुंचल्याने रंगविलेले देखावे तोंडात बोटं घालायला लावतात. तपकिरी, नारिंगी आणि राखाडी रंगाच्या इतक्या छटा असू शकतात अशी मी कल्पनासुद्धा केली नव्हती. येथील एका भागाला तर साल्वाडोर दाली डेझर्ट असंच म्हटलं जातं कारण दाली ह्या जगप्रसिद्ध चित्रकाराच्या Surrealist शैलीतून निर्माण व्हावी अशी दृश्यं इथे दिसतात (ह्याची झलक आणि फोटो मात्र






पुढच्या भागात)

पण ह्याहीपेक्षा नेत्रदीपक आहेत ती ठायी ठायी वाटेत लागणारी सरोवरं. हे वाळवंटाचे लाल, नारिंगी, सोनेरी रंग नजरेत भरतात न भरतात तेव्हढ्यात एक खिंड ओलांडून गेल्यावर लगूना कनापाची गर्द निळाई आणि त्यात विहरणारे सुंदर गुलाबी रोहित (फ्लेमिंगो) समोर येतात. येथून पुढे एका मागोमाग एक लागणारी दृष्टी सुखवणारी सरोवरं - लगूनाहोंडा, हेडीओंडा, त्यातील रोहित पक्षांचे थवे, मध्येच आकाशातून पाण्यावर झेप घेणारे उमदे अँडियनगल पक्षी हवेतील हाड गोठविणाऱ्या थंडीचा सुद्धा विसर पाडतात.

ह्या सर्व प्रवासात एकच रंग दिसत नाही तो म्हणजे हिरवा. अर्थात ज्या प्रदेशात संपूर्ण वर्षभरात केवळ १५मि.मी. एव्हढाच पाऊस पडतो (अगदी सहारा वाळवंटात सुद्धा सरासरी ७६ मि.मी. म्हणजे सिलोली पेक्षा पाचपट जास्त पाऊस पडतो) तिथे हिरवळ आणि झाडं झुडुपं दिसणं कठीणच. पण हे वाळवंट निर्मनुष्य असलं







तरी जीवन विरहित मात्र नाही. ह्या वैराण, नापीक प्रदेशात सुद्धा ज्या काही थोड्या फार वनस्पती तगून राहतात, त्यावर जगणारे उंदीर, ससे, वायकुन्या (लामा, अल्पाका सारखा 'Cameloid सस्तन प्राणी) आणि त्यांची शिकार करणारे कोल्हे, प्युमा सारखे प्राणी, रोहित, गल, गिधाडं इत्यादी ८० प्रकारचे पक्षी इथे सुखाने नांदतात आणि निर्मनुष्य परिसर असल्याने कदाचित थोडं अधिकच आनंदाने).

अर्थात सिलोली मधील चमत्कारांची यादी इथेच संपत नाही. सोलदमन्याना (मराठी मध्ये 'पहाटेचा सूर्य') नावाचे उकळते झरे, तप्त गंधकाची विवरे, आकाशात उंच वाफेचे झोत उडवणारे गीझर ह्यांनी भरलेलं पठार, तेर्मास द पोल्कस येथील गरम पाण्याची कुंडे, मृत ज्वालामुखीच्या उथळ विवरांत निर्माण झालेली लगूना कोलोराडा (मराठी मध्ये लाल सरोवर) सारखी सरोवरे अशा असंख्य नवलाईच्या जागांची झलक आपण पाहणार आहोत ह्या पुढच्या भागात.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

पान ७ वरून **वाघांच्या आयुष्यावर..**

महाभारतातही वाघांबाबत संदर्भ आला आहे.

मा वनं छिन्धि सव्याघ्रं
मा व्याघ्रा: नीनशन् वनात्/
वनं हि रक्ष्यते व्याघ्रौ:
व्याघ्रान् रक्षति काननम्//

महाभारतातील या श्लोकाचा अर्थ आहे की ज्या जंगलात वाघांचा अधिवास आहे त्या जंगलांचा संहार करू नका. त्यात मुक्तपणे संचार करणाऱ्या वाघांची शिकार करू नका कारण जंगले वाघांना संरक्षण देतात आणि वाघ जंगलांचे रक्षण (जंगल तोड, चोरटी शिकार इ. पासून) करतात. आज मितीला म्हणावं अशा संख्येने वाघ फक्त भारतातच आढळतात. त्यांचं रक्षण आणि संवर्धन करणं आपलं कर्तव्यच आहे. पण 'अवनी' वाघिणीला कारण नसताना नरभक्षक ठरवून तिची हत्या करण्याची प्रकरणे प्रकाशात येऊन मन विषण्ण होते. वाघांच्या बाबतीत तरी राजकारण होऊ नये, करू नये हीच इच्छा!!!!

**संजय देवस्थळी**
९८३३८६६४६२




# वाटा विज्ञानाच्या

विद्यार्थी मित्रांनो, शालांत परीक्षेतील उज्वल यशाबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन. हीच यशाची कमान पुढे सतत चढती राहावी यासाठी साधलेला हा संवाद आहे.

शास्त्र, विज्ञान व अभियांत्रिकी शाखेत कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या दरवर्षी पाहावयास मिळते. विदयार्थ्यांच्या संख्येप्रमाणेच संधीचीही वानवा नाही.फक्त त्याविषयी योग्य ती माहिती सर्वांनाच असते असे नाही.

विज्ञान व अभियांत्रिकी शाखेतील पदवी अभ्यासक्रम राबवणाऱ्या शेकडो संस्था भारतात आहेत. त्यातील I.I.T. (आय. आय. टी) Indian Institute of Technology या २३ संस्थांचे जाळे भारतभर पसरलेले आहे. भारतातच नव्हे तर जगात या संस्था अग्रगण्य समजल्या जातात. इथे चालविलेले असंख्य अभ्यासक्रम हे भारतातील बुद्धिमान मुलांचे गेली ६० वर्षे आकर्षण बनून राहिले आहेत. गुणवत्ता जोपासणाऱ्या संस्थांमध्ये IIT चा अग्रक्रम आहे..

**या संस्थांची ठळक वैशिष्ठये**

१.संपूर्ण शैक्षणिक स्वायत्तता.
२.उच्चविद्याविभूषित व तज्ञ प्राध्यापक वर्ग.
३.अत्याधुनिक ग्रंथालये प्रयोगशाळा, वसतिगृहे, संगणक केंद्रे व इतर सुविधा.
४.संपूर्ण अभ्यासक्रम संस्थेच्या आवारात प्राध्यापकांसमवेत राहून पूर्ण करण्याची संधी.
५.सोन्याची किंमत असलेली पदवी.
६.मुलांची सर्वांगीण तयारी करून घेऊन त्यांना उद्योगजगत अध्यापन किंवा संशोधनासाठी कुठेही संधी मिळवून देणारा अभ्यासक्रम.

अर्थातच प्रत्येक विद्यार्थ्यांच्या तोंडी पहिले नाव IIT चेच असते. IIT मध्ये प्रवेश हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते.

IIT ची प्रवेशप्रक्रिया ही दोन पातळीवर आहे. ही प्रक्रिया अखिल भारतीय स्तरावर केली जाते. पहिली पातळी JEE Main या नावाने ओळखली जाते. साधारण १३ लाख मुले अखिल भारतात ही परीक्षा देतात. त्यातून पहिली २ लाख मुले दुसऱ्या पातळीवरील परीक्षेला पात्र ठरतात. JEE Main ही परीक्षा संपूर्ण वस्तुनिष्ठ पद्धतीची असून भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र व गणित या विषयांचा त्यात अंतर्भाव असतो. अभ्यासक्रम ११वी व १२वी CBSE बोर्डाचा आहे. ऋण पद्धतीची गुणप्रक्रिया अवलंबली जाते. दुसऱ्या पातळीवरची परीक्षा JEE Advanced या नावाने ओळखली जाते. ही परीक्षासुद्धा संपूर्ण वस्तुनिष्ठ पद्धतीची असून तिच्यात अनेक प्रकारचे बुद्धीला आव्हान देणारे प्रश्न विचारले जातात. संपूर्ण भारतात सर्वात आव्हानात्मक समजली जाणारी अशी ही प्रवेश परीक्षा आहे. याही परीक्षेला भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांचा ११ वी व १२ वीचा अभ्यासक्रम असतो. या कडक चाळणीतून शेवटी १०००० गुणवंत विद्यार्थी निवडून त्यांना IIT त विविध अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो. विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात हे गुणवंत भारताचे बिनीचे शिलेदार आहेत.

**प्रा. विनायक अंतरकर**
९८२०६५१०६८



।। श्री गजानन प्रसन्न ।।

# विनायकी चतुर्थी मंडळ, विलेपार्ले

**संकष्टी चतुर्थी**

**वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।**
**निर्विघ्नं कुरुमे देव सर्वकार्येषुसर्वदा।।**

**अथर्वशीर्ष सामुहिक पठणाच्या उपक्रमाची गेल्या४० वर्षांची अखंड परंपरा.**

**सौ. निलम गोगटे (सहकार्यवाह)**

इतर समिती सदस्य / मार्गदर्शक - **धनंजय गोखले, मीनाताई देशमुख, संध्या धाक्रस.**

विनायकी चतुर्थी मंडळ ही नोंदणीकृत संस्था नाही. २०१० साली पार्लेश्वर मंदिरातील मूर्ती



पार्ल्यातील काही गणेशभक्तांनी सुमारे ४० वर्षांपूर्वी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल चतुर्थीला गणपती अथर्वशीर्षाची सामुहिक आवर्तन अगोदर एका सामाजिक संस्थेच्या सभागृहात व नंतर पार्लेश्वर गणेश मंदिरात म्हणण्याचा उपक्रम सुरु केला. या उपक्रमाला थोड्याच अवधित चांगला प्रतिसाद मिळाला. ७०-७५ भक्त यात सहभागी होत असत. त्या वेळी श्री. राजाभाऊ ताम्हणकर, कानिटकर–बर्वे अशा अनेकांनी सातत्याने उपक्रम सुरु ठेवला.

पार्लेश्वर गणेश मंदिरात आत्ता जी मोहक व भव्य मूर्ति आपण पाहतो त्याची प्राणप्रतिष्ठा १९८५ साली करण्यात आली. गेली १५ वर्ष या मंडळाचे उपक्रम शिस्तीने सुरु ठेवण्याची जबाबदारी खालील कार्यकारी मंडळ पार पाडत आहे.

स्थापनेला २५ वर्षे झाली याचे औचित्य साधून नोव्हेंबर २०१० साली आमच्या कार्यकारी मंडळाने एका दिवसात सामुहिक १ लक्ष अथर्वशीर्षाच्या आवर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला. त्यात एकूण ८०० ते १००० गणेशभक्तांनी भाग घेतला व १ लक्ष आवर्तनांचा संकल्प सिद्धीस गेला.

त्याचप्रमाणे डिसेंबर, २०१५ साली मंडळाने यथाशक्ती एका दिवसात सामुहिक आवर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळी ५५ हजार आवर्तनांची नोंद झाली. उरलेली ४५००० आवर्तन विनायकी चतुर्थी मंडळातर्फे टप्याटप्यानं भक्तांनी करुन पुन्हा १ लाख आवर्तन सिद्ध केली. या आधी पूर्वी ३-४ वेळा एका दिवसात १ लक्ष आवर्तनांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



**मधुसुदन वै. जोशी**
**(अध्यक्ष)**
**(मो. ९८३३४२५९२४)**
**शरद पटवर्धन (कार्यवाह)**
**(मो. ९८२०९५७२४५)**
**सौ. गौरी भोगले**
**(खजिनदार)**

गेल्या १० वर्षात आवर्तन करण्याबरोबर या मंडळाने काही नविन उपक्रम सुरु केले ते असे :-

१) मंडळाच्या भक्तांच्या वार्षिक सहली टिटवाळा गणपती, दिवेआगर सोन्याचा

गणपती दर्शन, लोणावळा मनशक्ति, तसेच डहाणू येथील महालक्ष्मी मंदिर - वनवासी केंद्र इ.



ठिकाणी आयोजित केल्या.

२) पूर्वी कांदे नवमीच्या दिवशी मंडळातील भक्तांचे एक सम्मेलन आयोजित केले जात असे. त्यात बदल करुन वार्षिक सम्मेलन उत्कर्ष मंडळ सभागृहात साजर केलं जात.या सम्मेलनात पार्ल्यातील दोन शाळेतील १०वी परीक्षेतील गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या पालकांसमवेत केला जातो. त्यातील अनेक विद्यार्थी आज सरकारी किंवा खाजगी कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहेत असं समजतं. या सम्मेलनात पार्ल्यातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले जाते. त्यांचा सन्मान केला जातो व त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो.

२०१६ साली झालेल्या सम्मेलनाच्या प्रमुख पाहुण्या वीरमाता अनुराधाताई गोरे या होत्या. त्यांनी सत्काराला उत्तर देताना उपस्थित भक्तांना विचारलं की तुम्ही 'देवभक्ती' करता पण 'देशभक्ती' करता का ? सैनिक निधीसाठी यथा शक्ती मदत करा. या सूचनेची त्वरीत अंमलबजावणी कार्यकारी मंडळाने केली व २०१६ पासून प्रतिवर्षी ७ डिसेंबर रोजी Flag Day च्या शुभारंभाच्या दिवशी देणगी अर्पण केली जाते. मंडळातील सर्व भक्त, हितचिंतक यांनी उदार मनाने गेल्या ६ वर्षात सुमारे रु. ८ लाख एवढी रक्कम मंडळातर्फे सैनिक निधीला दिली.

७ डिसेंबर २०२१च्या समारंभात रु.२,६७,०००/- रकमेची देणगी राज्यपालांना कार्यवाह शरद पटवर्धन यांनी अर्पण केली. तसेच या कार्यक्रमात विनायकी चतुर्थी मंडळाच्या योगदानाची दखल घेतली गेली व राज्यपालांच्या हस्ते मंडळाला एक Trophy (मानचिन्ह ) देण्यात आली. वीरमाता अनुराधाताई गोरे यांच्या एका उपदेशाचे मनापासून पालन करुन एका सत्कार्याला हातभार लावल्याच समाधान कार्यकारी मंडळ सदस्यांना आहे.

सामाजिक सेवेचे भान :

मंडळाकडे गेल्या काही वर्षात भक्तांकडून तसेच हितचिंतकांकडून जमा झालेल्या देणग्या मुदत ठेवीत गुंतवल्या होत्या. कार्यकारी मंडळाने असा निर्णय घेतला की त्यापैकी काही रक्कम धार्मिक व गरजूंना मदत करणाऱ्या विश्वासपात्र सामाजिक संस्थांना दान करावी. त्याप्रमाणे एकूण रु. ९० हजार रकमेच्या देणग्या विजयादशमीच्या शुभदिनी ऑक्टोबर २०२१ मध्ये देण्यात आल्या.

परिस्थितीप्रमाणे बदल घडवणे हे मंडळांनी अंगीकारलं आहे. २२ मार्च २०२० रोजी संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर झाला. त्याआधी म्हणजे डिसेंबर २०२० पासून दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीला सामुहिक आवर्तन पार्लेश्वर गणेश मंदिरात करण्याला सुरुवात केली. संकल्प एक वर्षात २१ हजार आवर्तन करण्याचा होता. पण मंदिरं बंद झाली. नंतर कल्पना सुचली की सर्वांनी प्रत्येक संकष्टीच्या दिवशी सोईनुसार किमान २१ आवर्तन घरी करावी. त्याला अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. मुंबई-ठाणे-पुणे- हैद्राबाद-बँकॉक येथील गणेशभक्त सहभागी झाले व जानेवारी २०२१ पर्यंत ४४ हजार आवर्तन संपन्न झाली. यानंतर विश्वस्तांची संमत्ती मिळाल्यास विनायकी चतुर्थी ऐवजी संकष्टीचतुर्थीला नित्यक्रमाप्रमाणे पार्लेश्वर गणेश मंदिरात आवर्तन करण्याचा प्रस्ताव दिला आहे. तोपर्यंत घरीच आवर्तन करुन मंडळाच्या प्रतिनिधीला कळवावी हा उपक्रम सुरुच आहे. संकष्टीला गणेशमंदिरात आवर्तन केल्यास भक्तांची संख्या वाढेल अशी खात्री वाटते. विनायकीचतुर्थी मंडळाचा उपक्रम सातत्याने ४० वर्षांहून अधिक काळ सुरु आहे हीसुद्धा श्रींची इच्छा असं म्हणावसं वाटतं.

विनायकी चतुर्थी मंडळाच्या सर्व कार्यक्रमांसाठी पारले हिंदू देवालय मंडळाचे विश्वस्त, पुजारी व सेवकवर्ग यांचे सहकार्य नेहमी लाभते त्याबद्दल मंडळातर्फे मी कृतज्ञता व्यक्त करतो.

**शरद पटवर्धन (कार्यवाह)**
विनायकी चतुर्थी मंडळ


ही माहिती वाचून ज्या भक्तांना आवर्तन करण्याची इच्छा झाली त्यांनी मंडळाच्या खालील प्रतिनिधींकडे संपर्क साधावा ही विनंती.

**निलम गोगटे - मो. ९२२०९५५७४७५**
**गौरी भोगले - मो. ९८७००२०९६५**
**संध्या धाक्रस - मो.७५८८७००२६७**
**संपर्काची वेळ - सकाळी ११ ते १ व संध्याकाळी ५ ते ७**

# Home Automation & Auto Dimming Lights

- If there is a FIRE at your Home/Office/Factory/Shops, do you want ALARM on your SMART PHONE?
- Do you want your washroom light to come on, after entering & switch off when you leave?
- Do you want to control your fan/light/AC/TV through your SMART PHONE from anywhere, through internet?
- Do you want to schedule ON/OFF of your fan/light/AC/TV ?
- Do you want to open/close curtain through your SMART PHONE from anywhere, through internet?
- Do you want burglar alarm on your phone when your Home/Office/Factory/Shop is intruded?
- Do you want to reduce Power Bill by using Auto dimming Lights in common areas like staircase, parking bays, passages, lift entrance etc?

Then opt for **Starrbot Home Automation.** Indian brand,Indian Products come with 2 to 5 years warranty.
You can opt for Starrbot Dimming lights to give 80% energy saving



## IT'S TIME TO TURN INTO AUTOMATION

**Contact : Super Distributor Industrial Controls & Appliance**
Phone No: 9545944795
Person : Mr. Avinash Joshi
Mail ID : automation@icamumbai.com
Address : 101, Twin Complex Phase-1, 1st Floor, Opp. Fire Brigade, Marol Maroshi Road, Andheri East, Mumbai-400059.

**Distributors/ Dealership- Trade enquiries solicited**






गेली दोन वर्षे आपण कोरोनाच्या संकटात होतो, पण तेव्हापासून एका चित्रपटाच्या प्रदर्शनाची आपणाला उत्सुकता होती आणि तो चित्रपट म्हणजे महेश मांजरेकर दिग्दर्शित **'पांघरूण'**. या महिन्यात हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. नुकताच त्याचा ट्रेलर आपण पाहिला असेल. ट्रेलर पाहताना आपल्याला स्वातंत्र्यापूर्वीचा काळ लक्षात येतो आणि निसर्गरम्य कोकणचे दर्शन घडते. लहान वयातच विधवा झालेल्या नायिकेचे वडिलांच्या वयाच्या माणसाशी लग्न होते. वयाने मोठ्या असणाऱ्या आपल्या सहजीवनातील साथीदाराबद्दलची ओढ आणि त्यातून होणारी तिची घालमेल यात पाहायला मिळते.

तिच्या आयुष्याचा संसारिक प्रवास कसा होतो हे हळूहळू उलगडत जाणारी **'एक विलक्षण प्रेम कहाणी'** आपल्याला **'पांघरूण'** मध्ये अनुभवायला मिळणार आहे.

महेश मांजरेकर व झी स्टुडिओज **'पांघरूण'** च्या निमित्ताने पुन्हा एकदा अनोखा कलाविष्कार रसिक प्रेक्षकांसमोर सादर करण्यास सज्ज झाले आहेत. महेश मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटाला हितेश मोडक, डॉ. सलील कुलकर्णी, पवनदीप राजन आणि अजित परब यांचे संगीत लाभले आहे. वैभव जोशी यांनी चित्रपटाची गाणी लिहिली आहेत. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हजेरी लावणाऱ्या या चित्रपटात गौरी इंगवले, अमोल बावडेकर, रोहित फाळके, विद्याधर जोशी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

**'पांघरूण'**च्या निमित्ताने बऱ्याच काळानंतर रसिक प्रेक्षकांना सुरेल, अविस्मरणीय संगीत व भावनिक, दर्जेदार असे कथानक रुपेरी पडद्यावर अनुभवायला मिळणार आहे .

## मनोरंजन विश्व




आपल्या चित्रपटसृष्टीत माध्यमांतर अनेकदा होत असते. सुरेश जयराम यांच्या नाटकावर आधारित **'लोच्या झाला रे'** चित्रपट सुद्धा फेब्रुवारी महिन्यात प्रदर्शित होत आहे. म्हणजे हे त्या नाटकाचे माध्यमांतर म्हटले पाहिजे.

या चित्रपटात सयाजी शिंदे यांचा भाचा अंकुश चौधरी याच्या बायकोला भेटायला लंडनला येतो आणि मग तिथून सगळा गोंधळ सुरु होतो. चित्रपटात वैदेही परशुरामी नेमकी अंकुशची बायको आहे का सिद्धार्थची ? याबाबत झालेला गोंधळ आपल्याला यात पाहायला मिळत आहे. हा गोंधळ आणि पळापळ कशासाठी सुरु आहे, कोणाच्या आयुष्यात लोच्या झाला आहे. या सगळ्याचीच उत्तरे आपल्याला या चित्रपटातून मिळणार आहेत. सुमारे एक महिना या चित्रपटाचे चित्रीकरण लंडनमध्ये पार पडले. तिथल्या सततच्या बदलत्या हवामानामुळे चित्रीकरणा दरम्यान कलाकारांसह इतर टीमलाही विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. कधी अवकाळी पाऊस तर कधी कडाक्याची थंडी यामुळे कलाकारांसोबत संपूर्ण टीमला अनेक कसरती कराव्या लागल्या.

पारितोष पेंटर आणि रवी अधिकारी यांनी **'लोच्या झाला रे'** या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून छायाचित्रणाची धुरा संजय मेमाणे यांनी सांभाळली आहे. नवीन चंद्रा, नितीन केणी, पारितोष पेंटर आणि शांताराम मनवे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे तर मंगेश रामचंद्र जगताप कार्यकारी निर्माता आहेत. लंडनमध्ये चित्रित झालेला हा चित्रपट मुंबई मुव्ही स्टुडिओज प्रस्तुत आयडिया दि एंटरटेनमेंट कंपनी आणि अभिनय मुंबई प्रोडक्शन अंतर्गत बनवण्यात आला असून वितरणाचे काम यूएफओ मुव्हीझने पाहिले आहे.

या चित्रपटात अंकुश चौधरी, वैदेही परशुरामी, सिद्धार्थ जाधव, सयाजी शिंदे, रेशम टिपणीस, विजय पाटकर, प्रसाद खांडेकर आदी कलाकारांच्या भूमिका आहेत.

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# श्रध्दांजली... नारायण जुवेकर

माझे काका श्री. नारायण जुवेकर ह्यांना १८ जानेवारी रोजी रात्री देवाज्ञा झाली. त्यांचे वय ९२ वर्ष पूर्ण होते.

पार्ल्यात त्यांना अनेक जण ओळखतात कारण ते सामाजिक कार्यकर्ते होते. 'सोबती'या जेष्ठ नागरिक संघटनेमध्ये तर अनेक वर्ष ते कार्यरत होतेच, पण सावरकर केंद्रातही खजिनदार म्हणून त्यांनी आपली भूमिका चोख बजावली होती. 'स्नेहबंधन' ह्या वृध्दाश्रमासाठी आणि 'स्नेहज्योती' या अंधविद्यालयासाठीही ते कार्य करत होते.

ह्या संस्थांसाठी देणगी मिळवून देण्यासाठी ते प्रयत्न करायचे, आणि लाखोंच्या देणग्या त्यांनी मिळवून दिल्या होत्या.देवरूखे ब्राम्हण मंडळासाठी ते कायम मदत करत होते, जातीने अनेक उपक्रम राबवत होते. कोळबांद्रे दापोली या आमच्या गावी गणेश मंदीर बांधण्यात त्यांचा पुढाकार होता आणि पुढे ४० वर्ष त्याची देखभाल सुध्दा त्यांनी सांभाळली.

अनेक संस्थांनी त्यांच्या या कार्याची दखल घेऊन, त्यांचा सन्मानपूर्वक गौरव केला आहे.

त्यांना कविता करायचा नाद होता. त्यासाठी त्यांना विषयाचे वावडे नव्हते. ते शीघ्रकवी होते. अनेक स्पर्धातून त्यांनी कवितेसाठी बक्षिसं मिळवली होती.महानगरपालिकेत ३९ वर्ष नोकरी करत असतांनाही त्यांना काव्यप्रेमी मित्र मिळाले आणि त्यामुळेच 'अक्षर आस्वाद' या काव्याला वाहिलेल्या १० वर्षाच्या चळवळीत ते सक्रिय भाग घेत होते.

त्यांनी कविता, संगीतिका, एकांकिका, पोवाडे, आरत्या, स्फूर्तिगीते असे विपुल लेखन केले. 'जीवन आनंदे भरले' आणि 'आनंद तरंग' हे दोन कविता संग्रह आणि 'निवडक आरती संग्रह' अशी ३ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

ते माझ्या वडिलांचे धाकटे चुलत भाऊ. पण त्यांची दोघांची मैत्री होती. काका खूप गप्पिष्ट होते. ते नेहमी आमच्याकडे येत आणि विविध विषयांवर त्यांच्या गप्पा रंगत.

''बोले तैसा चाले..त्याची वंदावी पाऊले"

असे आपण नेहमी म्हणतो. पण अशी खूप कमी पाऊलं,आपल्याला,पहायला मिळतात. काकांची जीवनशैली पहाता, त्यांनी केलेले समाज कार्य पहाता, त्यांचे बोलणे आणि वागणे पहाता .. ते 'बोले तैसा चाले" याप्रमाणेच होते आणि त्यामुळे कवितेतही त्यांचे ते विचार आपल्याला पदोपदी जाणवतात.

मित्रांचे कौतुक, गुरूंबद्दल आदर, देशप्रेम, देवावरील निस्सिम भक्ति, समाजाचे ऋण, सामाजिक बांधिलकी, समाजातील प्रसिध्द व्यक्ती, कवी, लेखक ह्यांच्याबद्दल आदर व कृतज्ञता .. हे सर्व त्यांच्या बोलण्यात यायचे आणि त्यांचे सहज केलेले उपदेश,त्यामुळेच आम्हाला वंदनीय वाटायचे. ते पार्लेकरांच्या सदा आठवणीत रहातील यात काही शंका नाही.

**दिलीप जुवेकर**
९८३३०८१७०२

# अभिनंदन





गंधाली (संपादक .. डॉ. मधुकर वर्तक)दिवाळी वार्षिक आयोजित, सुप्रसिद्ध लेखिका गिरिजा कीर कथा स्पर्धेत आपल्या पार्ल्याच्या चित्रा मेहेंदळे (तृतीय पारितोषिक.. वर्ष२०१९) आणि क्षमा गोसावी (उत्तेजनार्थ पारितोषिक, वर्ष २०१९, २०२१.) यांना पारितोषिक मिळाले आहे.कोविड मुळे लांबलेला पारितोषिक वितरण समारंभ, नुकताच गोरेगावला, प्रबोधनकार ठाकरे वाचनालयात संपन्न झाला.मुंबई साहित्य संघाच्या कार्याध्यक्ष व प्रसिध्द लेखिका प्रा. उषा तांबे ह्या प्रमुख पाहुण्या होत्या. डॉ . संजय कीर ह्या प्रसंगी उपस्थित होते.

चित्रा मेहेंदळे व क्षमा गोसावी यांचे 'आम्ही पार्लेकर तर्फे" अभिनंदन!



Want to learn car driving easlly ?

Own a car, have a driving license but no conFidence to drive in traffice !!

You must be in search of a perfect driving instructor !! If yes, you are at right place... your personal & dedicated instructor will teach you lessons for perfect driving

अधिक माहीती साठी संपर्क करा
8108048239/ 8850686346

# लतादीदींचे पार्ल्याशी असलेले ऋणानुबंध


श्रीधर फडके


विनित गोरे


मंदार कर्णिक




नीला रवीन्द्र


पं. अजय पोहनकर


वैशाली सामंत


प्रसाद महाडकर

स्वरसम्राज्ञी, भारतरत्न लतादीदी मंगेशकर म्हणजे एक जरतारी सूर आणि या सूरांवर रसिकांनी डोलावे हा एक ईश्वरी संकेत ----- त्यांच्या सहवासातील असंख्य आठवणी आज दाटून येत आहेत ----- अगदी ‘प्रभूकुंजा’ पासून ते आपल्या पार्ल्यातल्या ‘दीनानाथ नाट्यमंदीरा’ पर्यंतच्या -----फेब्रुवारी १९८५ मध्ये ‘मैफिल’ या कार्यक्रमाच्या निमित्ताने संगीत क्षेत्रातील माझे स्नेही व संगीत दिग्दर्शक अनिल मोहिले यांच्या सोबत प्रभूकुंजात मी प्रथमच दीदींना भेटले. अनिल मोहिले आणि मी दोघांनी मिळून ‘प्रथमेश ऑडिओसाठी’ ‘मैफिल’ या भावगीतांच्या कॅसेटची निर्मिती केली होती आणि त्याचे प्रकाशन (आमच्या भिडे बंगल्याच्या गच्चीवर) माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते संपन्न होण्याचे भाग्य लाभले होते. दीनानाथ नाट्यमंदीरात ‘मैफिल’ या कार्यक्रमाचा शुभारंभ लतादीदींच्या आशिर्वादाने व्हावा ही आमची दोघांची इच्छा दीदींनी मान्य केली --- २३ फेब्रुवारी १९८५- या दिवशी अंगात ताप असूनही त्या आल्या. कार्यक्रमात सुरवातीला ‘पार्लायन्स’ या संस्थेचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. दीनानाथ नाट्यमंदीरातील प्रेक्षागृह दीदींना पहाण्यासाठी आणि ऐकण्यासाठी आतूर झाल होत----- दीदींनी त्यांच्या भाषणात सुरवातीलाच ‘संगीत प्रेमी पार्लेकर“, पार्ल्याचे पु. ल. देशपांडे ‘दीनानाथ नाट्यमंदीर’ या विषयीच्या त्यांच्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर लोकसत्ताचे संपादक माधवराव गडकरी म्हणाले ‘दीदी आमचं पार्ले गाव हे तुमचं माहेर’ आहे अस समजा आणि या माहेरी नेहमी येत जा. (टाळ्यांचा कडकडाट)-- आणि खरोखरच त्यानंतर पार्ल्यातील अनेक संगीत सोहळे लतादीदींच्या आशिर्वादपर सहभागाने ‘श्रीमंत’ होत गेले. पार्ल्यातील अनेक गायकांचे तसेच संगीत क्षेत्राशी निगडीत असलेल्या अनेकांचे दीदींशी अत्यंत जिव्हाळ्याचे व घरगुती संबंध होते.

**नीला रवीन्द्र**
**९८१९७ ८५६६**




## प्रॉपर्टी एक्स्पो २०२२

पार्ले बझार डॉट कॉम सादर करत आहे एक अनोखा डिजिटल मेगा प्रॉपर्टी शो **Property Expo 2022** २५-३० एप्रिल २०२२.

आता घर खरेदी करायचे असेल, घराचे इंटिरियर करायचे असेल, सेकंड होम निवडायचे असेल वा अगदी घरासाठी लागणारे कर्ज कुठून घ्यायचे या विचारात असाल तर अजिबात काळजी करू नका. या सगळ्या गोष्टी तुम्हाला तुमच्या घरी बसून अगदी एका क्लिकवर करता येतील.

पार्ले बझार डॉट कॉम सादर करत असलेल्या डिजिटल प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये पार्ल्यातीलच नव्हे तर मुंबई, पुणे, नाशिक अशा अनेक ठिकाणांतील वेगवेगळे डेव्हलपर्स आपल्या प्रॉपर्टीज, वेगवेगळे प्रोजेक्ट्स प्रदर्शित करु शकतील. वेगवेगळ्या प्रकल्पांबरोबरच इतर अनेक पर्याय तसेच सेकंड होम ऑप्शन्स, लँड, प्लॉट्स अशा गोष्टींचेही वेगवेगळे पर्याय येथे बघायला, पारखायला मिळतील.

हा एक्स्पो २५-३० एप्रिल २०२२ दरम्यान संपन्न होईल. हा एक्स्पो अटेंड करण्यासाठी **propertyexpo.parlebazaar.com** या साइटवर जाऊन साईनअप करता येईल आणि लॉगीन केल्यानंतर हॉल्स या पेजवर आपण **Real Estate Projects, Consultants, Alied Products and Service, Loans and Finances, 2nd Home Option** हे वेगवेगळे हॉल्स बघू शकाल.

तुम्हाला हव्या त्या हॉलमध्ये क्लिक केल्यानंतर वेगवेगळ्या प्रोजेक्ट्सचे, कंपनीचे बूथ दिसतील.

तुम्हाला हव्या असलेल्या बूथवर क्लिक केल्यावर त्या प्रोजेक्टची, कंपनीची माहिती देणारे एक पेज ओपन होईल जेथे त्या प्रोजेक्टबद्दलची, कंपनीबद्दलची संपूर्ण माहिती, फोटोज, व्हिडिओज तुम्ही बघू शकाल. त्यांच्या रिप्रेझेंटेटिव्हबरोबर चॅट करून तुमच्या शंकांचे निरसनही करता येईल .

या एक्स्पोमध्ये प्री रजिस्टर केल्यास एक्स्पोबद्दलची माहिती, अपडेट्स तुम्हाला वेळोवेळी कळविण्यात येतील. मग वाट कसली पाहताय ? साइटवर जाऊन आजच व्हिजिटर प्री-रजिस्ट्रेशन करून घ्या.

या एक्स्पोमध्ये एक्झिबिट करणाऱ्यांनाही खूप कमी किंमतीत भरपूर लोकांपर्यंत पोहोचता येईल आणि आपल्या बद्दलची माहिती सहजपणे तुमच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवता येईल.

तुम्ही डेव्हलपर असाल, कन्सल्टंट असाल, आर्किटेक्ट, इंटिरिअर डेकोरेटर, फायनान्स किंवा प्रॉपर्टी एक्स्पोच्या कोणत्याही बाबींशी निगडित असाल तर तुमचा स्टॉल नक्की बुक करा.

**मग वाट कसली बघताय ?**

**लवकरच तुमचे बूथ बुक करा.**
**संपर्क :**
**propertyexpo.parlebazaar.com**

**आम्ही पार्लेकर वृत्तपत्र** आणि **Townparle.in** हे या एक्स्पोचे माध्यम प्रायोजक आहेत.